## प्रकरण दुसरे

## वसुधा पाटील यांच्या कथेची जडणघडण

वसुधा पद्माकर पाटील यांचा जन्म १५ नोव्हेंबर, १९३० रोजी मुंबई, गोरगांव येथे झाला. त्यांचे माहेरचे नाव स्नेहलता बाळकृष्ण सावंत असे आहे. त्यांचे बालपण बांद्रा येथे गेले. शालेय शिक्षण 'पार्ले टिळक विद्यालय' विले पार्ले येथे तिसरीपर्यंत, त्यानंतरचे शिक्षण 'अभिनोरेगावकर इंग्लिश स्कूल', गोरेगाव, मुंबई येथे पूर्ण झाले. त्या एम्. ए. बी. एड्. असून 'आर्ट मास्टर' आहेत. त्याचबरोबर एम्. ए. इंटायर पेंटींग झाल्या आहेत. इतिहास व पेंटिंग या विषयातही त्यांना आवड आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे त्या ड्रॉईंग टिचर होत्या. त्यानंतर जवळजवळ ३४ वर्षे 'अभिनोरेगावकर इंग्लिश स्कूल' येथे त्यांनी शिक्षिका म्हणून काम केले.

वसुधा पाटील यांना लहानपणापासूनच गोष्टी सांगण्याची व ऐकण्याची आवड होती. स्वत: एखादया विषयावर गोष्ट रचून ती लहान भावंडांना सांगणे त्यांना खूप आवडत असे. आजी व आजोबांच्या आग्रहास्तव एखादी कथा त्यांना वाचून दाखविणे किंवा वाचलेली कथा त्यांना सांगावी लागत होती. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक असल्याने तेही शिक्षणप्रेमी व वाचनाची आवड असलेले होते. विविध पुस्तकांचा संग्रह त्यांच्या वडीलांनी घरी केला होता. एक छोटसं वाचनालयच त्यांच्या घरात उपलब्ध असल्याने नकळतपणे वसुधा पाटील यांना वाचनाची आवड निर्माण झाली. त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली व सुसंस्कृत होती. त्यांना चार भावंडे असल्याने कथा सांगण्यात रस वाटे. त्यांच्या सहवासात त्यांचे बालपणीचे दिवस फुलपाखरासारखे निघून गेले. पण लहानपणीच आईचे निधन व नंतर वडिलांचे निधन त्यामुळे वसुधा पाटील पोरक्या झाल्या व त्यांचे मायेचे छत्र हरवले.

वसुधा पाटील यांना वाचन व लिहिण्याबरोबरच ड्रॉईंगचीही फार आवड आहे. शाळेत असतांनाच चित्र काढण्याची आवड निर्माण झाली. म्हणूनच पुढे त्यांनी एम्. ए. एंटायर पेंटिंग पूर्ण केले. व कांही काळ 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई' येथे त्यांनी ड्रॉईंग टीचर म्हणून काम केले. त्यांच्या चारी भावंडानाही ड्राईंगविषयी आवड होती. त्याकाळात त्यांचे वडिल 'संततिनियमन' या मासिकाचे वर्गणीदार होते. मुलांसाठी त्यांनी घरात 'आनंद' व 'शालापत्रके' ही दोन मासिके चालू होती. त्याचबरोबर 'स्त्री', 'किर्लोस्कर' 'रत्नाकर', 'चित्रमयजगत' इत्यादी मासिके त्यांच्या घरीच उपलब्ध असल्याने वाचनाचा लाभ तर मिळालाच पण स्त्री विषयक लेखनास ख-या अर्थाने एक प्रेरणा मिळाली.

शिक्षिका होणं हे वसुधा पाटील यांच एक लहानपणापासूनच स्वप्न होतं. म्हणून त्या म्हणतात, "प्रथम शिक्षिका आणि मग लेखिका."[१] म्हणून शिक्षिका झाल्यानंतरच एकांकिका लेखनापासून त्यांनी साहित्य लिखाणास प्रारंभ केला. एकांकिका लेखनामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केलेली दिसून येते. स्त्री लेखिकामध्यें एवढया मोठया प्रमाणावर कोणीही एकांकिका लेखन केलेले आढळत नाही. 'पियानो' -१९७४ साली प्रसिध्द झालेल्या त्यांच्या एकांकिका संग्रहाला महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरविले आहे. म्हणून वि. भा. देशपांडे म्हणतात, "विषय-आशय भिन्नतेच्या दृष्टीने विचार केला तर वसुधा पाटील, विद्याधर पुंडलिक यांच्या लेखनात तो आढळतो."[२] वसुधा पाटील यांच्या 'अनाथ', 'जात', 'धर्म', 'सरहद्द' ह्यातील विषय मराठी एकांकिकेला नवे आहेत.

मराठी साहित्यातील एकांकिका या वाङ्मयप्रकारात आपले म्हणून एक स्वतंत्र अस्तित्व वसुधाबाईनी निर्माण केले आहे. मनाची भावूकता, दु:खाची आर्तता सामाजिक कारुण्य भावस्पर्शी संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी, वेदनेला सौंदर्य प्राप्त करून देऊन जीवनाला अर्थ घनता प्राप्त करून देणारी एक सामर्थ्यशाली लेखिका म्हणून वसुधा पाटील यांचा उल्लेख करावा लागेल. 'जात' मधील तृतीयपंथी माणसाच्या भावविश्वाचे दर्शन मराठी एकांकिकेत त्यांनी प्रथमच आणले.

' धर्म ' मधील व्यक्तिरेखेच्या निमि-ताने गुप्तरोगाचा विषय एकांकिकेत आणला. तर 'सरहद्द ' मध्ये युध्द, सैनिक यांचा विषय मर्यादित अर्थाने आला. युध्दसंबंधित जीवन किंवा सैनिकांचे भावविश्व यामध्ये चित्रित झाले आहे. त्यांची 'अनाथ' ही एकांकिका वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावते. याचे कारण म्हणजे त्यातील विषय आणि आशय होय. १९५६ साली 'वसुधा' या मासिकात त्यांची पहिली कथा प्रसिध्द झाली. विजय तेंडुलकरांनी त्यांची ही कथा स्विकारली. व त्यांचा मान राखला. म्हणून वसुधा पाटील म्हणतात, "विजय तेंडुलकरांसारख्या श्रेष्ठ कलावंताने माझ्या कथा लेखनाला चैतन्य दिले. एक नवी प्रेरणा दिली."[3] त्यामुळे कथालेखनाचा उत्साह त्यांच्यात निर्माण झाला. 'सत्यकथा' या मासिकात 'आम्ही तिघं' हा पहिला ललितलेख राम पटवर्धन यांनी प्रसिध्द केला. आणि हा लेख आपल्याला खूप आवडल्याचे त्यांनी वसुधा पाटील यांना पत्राव्दारे कळविले, त्यामुळे आपण उत्कृष्ठ दर्जाचे ललितलेखही लिहू शकतो ही नवी जाणिव त्यांच्यात निर्माण झाली. 'सत्यकथा' सारख्या श्रेष्ठ मासिकाने त्यांच्या कथेचे मोल ठरविले. त्यांचे मोठे बंधू पू. बा. सावंत ही 'सत्यकथा' मधून लेखन करीत होते. त्यांच्या लेखनाचाही प्रभाव नकळतपणे त्यांच्यावर झालेला दिसून येतो.

' जमुना के तीर' हा त्यांचा पहिला कथा संग्रह १९६८ साली प्रकाशित झाला. त्यामध्ये १८ कथा असून त्यांचा ' वेगळी ' हा दुसरा कथासंग्रह १९७७ साली प्रकाशित झाला. त्यामध्ये ७ कथा आहेत.

१९४३ ते १९९० पर्यंतच्या ४० ते ४५ वर्षांच्या काळात वसुधा पाटील यांचे जवळ जवळ १६ च्या वर कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत ते म्हणजे -

(१) जमुना के तीर -१९६८ - महाराष्ट्र शासन पुरस्कार
(२) वेगळी -१९७७ - महाराष्ट्र शासन पुरस्कार
(३) वंशाचा दिवा -१९८६(दीर्घ कथा) - महाराष्ट्र शासन पुरस्कार
(४) बासरी (५) वड (६) प्रमेय
(७) बसंती (८) संसार (९) सरल
(१०) शांत सागरी कशाला (११) करपलेली पालवी (११) महाभारत
(१३) उडालेले रंग (१४) सोबत (१५) पुरुष
(१६) भेद इत्यादी कथा संग्रह प्रसिध्द आहेत.

कथालेखनाखेरीज वसुधा पाटील यांनी कादंबरी लेखनातही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

(१) मालवून टाक दिप – (१९७६), (२) आगतिक – १९७८

(३) फक्त एक वर्ष तीन महीने – १९९४ या कादंब-या लिहिल्या असून एकांकिका लेखनातही उल्लेखनीय कामगिरी त्यांनी केली आहे.

(१) पियानो – १९७४ – महाराष्ट्र शासन पुरस्कार याचबरोबर लहानमुलांसाठी 'सिंड्रेला' हे नाटक त्याचबरोबर 'रंगतदार बारा नाट्य छटा' आणि लहानमुलांसाठी बालवाङ्‌मय असे विपुल व चौफेर लेखन त्यांनी केलेले दिसून येते.

वसुधा पाटील यांची साहित्यसंपदा लक्षात घेता मराठी लघुकथा क्षेत्रात नवकथेपासून ते आजपर्यंतच्या कथेपर्यंत त्यांची कथा स्त्रियांच्या विविध व नवनव्या क्षेत्राचा मागोवा घेत, बहरत, फुलत आली आहे. वसुधा पाटील यांची १९६० नंतरची समृध्द , संपन्न आणि नव्या जाणिवा घेऊन अवतरलेली कथा अभ्यासत असतांना मराठी साहित्यातील त्यांची मोलाची कामगिरी लक्षात येते. अंजली सोमण म्हणतात, "१९६० नंतर आशय व अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने मराठी कथेला जी जी नवी परिमाणे लाभली, ती मिळवून देण्यात १९६० नंतर उदयास आलेल्या पुरुष – कथाकारांइतकेच कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सरिता पदकी, तारा वनारसे व वसुधा पाटील या लेखिकांचे कथालेखन – कर्तृत्व कारणीभूत ठरले."[४] असे अंजली सोमण म्हणतात.

शालेय जीवनापासून वसुंधा पाटील यांनी लेखनास सुरुवात केली आणि शिक्षिका झाल्यावर अनेक एकांकिका त्यांनी लिहिल्या व त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्याकडून बसवून घेऊन त्यांनी शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमातून सादर केल्या. त्यांना स्वत:ला आलेले अनुभव आणि सभोवतालच्या निरिक्षणातून त्या कथा लिहितात. वसुधा पाटील यांनी कथा, कादंबरी, एकांकिका हे वाङ्‌मय प्रकार हाताळले आहेत. पण त्याही पेक्षा 'कथाकार वसुधा पाटील' म्हणूनच त्या जास्त उदयास आल्या आहेत. जे भावलं, जे अनुभवलं ते कथेतून त्यांनी साकार केले आहे.

गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर या नवकथाकारांच्या नंतर शंकर पाटील द.मा. मिरासदार, विजय तेंडूलकर, जी.ए. कुलकर्णी, चि. त्र्यं. खानोलकर, दिलीप

चित्रे, या लेखकाबरोबरच कमल देसाई, सरिता पदकी यांनीही लेखन केले आहे. यांचे लेखन जसे उल्लेखनीय ठरते तसेच मराठी लघुकथेच्या क्षेत्रातील वसुधा पाटील यांचे स्थान स्पष्ट करताना डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, "१९६० ते ८० या कालखंडात आनंद यादव, रा. रं. बोराडे, वामन इंगळे, विजया राजाध्यक्ष, सुधा नखणे, वसुधा पाटील यांची नावे,प्रामुख्याने येतात."[5] आनंद यादव आणि रा. रं. बोराडे यांच्या कालखंडात लेखन करणाऱ्या वसुधा पाटील यांच्या लेखनावर मात्र कुणाचेही संस्कार झालेले दिसत नाहीत. त्यांची कथा जुने मानदंड झुगारून देते. आणि नवविचारांचे लेणे पांघरून मराठी वाचकांच्या मनात आपला वेगळा असा एक ठसा उमटविते.

वसुधा पाटील यांच्या स्त्री सुलभ आणि बहुश्रुत संपन्न व समृध्द व्यक्तिमत्वाचे दर्शन जसे त्यांच्या अनेक कथातून प्रकट झाले आहे. तसेच 'जमुना के तीर' या कथा संग्रहातील 'एका शनिवारची गोष्ट' या कथेतून एका कुटुंबातील व्यक्तींच्या बोलण्यात वारंवार म्हणींचा उल्लेख येतो. 'ते म्हणी म्हणजे अनुभवाच्या खाणी' अशा स्वरूपाच्या आहेत. आणि हा वास्तव जीवनातील अनुभव त्यांच्या कथेच्या जडणघडणीला पोषक ठरतो.

इ. स. १९६० नंतर ज्या स्त्री लेखिकांच्या कथा झपाटयाने बदलून अनेक नवनवी वळणे घेत गेल्या आहेत. त्यामध्ये वसुधा पाटील अग्रेसर असल्याचे जाणवते. या विषयी म. ना. अदवंत म्हणतात, "आता केवळ कौतुकाच्या अपेक्षेने स्त्रिया कथेच्या दालनात उतरल्या नाहीत. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व प्रकट होत आहे. सामाजिक जीवनाच्या अनेक कक्षा आपल्या दृष्टिकोनातून त्या उजळून टाकीत आहेत. कथेला वेगळा, नवीन असा घाट आणण्याची खटपट सुरू आहे. या पिढीतील कथालेखिकांचा उत्साह अमाप आहे. त्यांचे अनुभवही वेगवेगळ्या पातळीवर आहेत. यामुळे आजची ही नवी पिढी नव्या अपेक्षा निर्माण करीत आहे."[6] आणि अशा प्रकारचे चित्रण बदलत्या जीवनाचे भान ठेवून वसुधाबाईंनी आपल्या कथालेखनामध्यें पुरेपूर आणले आहे. तसेच आपल्या कथातून स्त्रीच्या भावविश्वाचे उत्कट चित्रण केले आहे.

वसुधाबाईंच्या कथेची वैशिष्टये लक्षात घेत असता त्यांचे कथाविश्व हे स्त्रीच्या सामाजिक, कौटुंबिक, भावजीवनाशी निगडीत असतांना दिसते. त्यांच्या कथेतील

स्त्रीची समजून घेण्याची जी वृ-ती आहे ती पुरूषमात्रापेक्षाही अधिक जाणवते. वसुधा पाटील यांची कथा साधी व सरळ असून त्यांच्या भाषेने अलंकारीकतेचे ओझे नाकारलेले आहे. रोजच्या आयुष्यात घडणा-या घटना ही त्यांच्या कथेची वैशिष्टये आहेत. उपमा व उत्प्रेक्षा क्वचित प्रसंगीच आढळतात. कथाभिव्यक्तीची वेगवेगळी रूपे त्यांच्या कथेतून येतात. यांचे अनुभवविश्व हे मर्यादित किंवा तोकडे नाही. किंवा त्यांच्या कथेने कुणाचे अनुकरण केलेले नाही. भाबडेपणा, श्रध्दाळूवृ-ती, आगतिकता अशी अनेक व्यक्तिचित्रणे त्यांच्या कथेतून डोकावतात. प्रेम, समर्पण, त्याग, निष्ठा, दिलदारपणा इत्यादी नाटयमय आवेगी चित्रणे त्यांच्या कथातून आली आहेत. वसुधाबाईंची निवेदन पध्दती सांकेतिक वाटते. पण असे असूनही त्यांच्या कथा मात्र सांकेतिक बनत नाहीत.

वसुधाबाईंच्या बहुसंख्य कथा हया स्त्रीमनाचे विविध पदर उलगडून दाखविणा-या आहेत. स्त्रीच्या मनातील संघर्ष प्रभावीपणे मांडण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. म्हणूनच, "१९६० नंतरच्या नव्या दमाने, नव्या जाणिवेने लेखन करणा-या कथा लेखिकांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान द्यावे लागेल."[७] असे भालचंद्र फडके म्हणतात. वसुधा पाटील यांच्या कथेतील कांही स्त्रिया आगतिक व असहाय्य आहेत. उदा. 'मनू', 'सुचेता', 'अपेक्षा' या कथेतून त्यांचे दर्शन घडते. स्त्री मनाबरोबरच कांही कथेतून त्यांनी पुरूष मनाचेही दर्शन घडविले आहे. आई-वडिल, बहीणभाऊ, स्त्री-पुरूष यांचे चित्रण त्यांच्या कथेतून घडते. त्यांच्या कथा ऐसपैस असतात पण प्रवाही निवेदनामुळे त्या वाचनीय वाटतात.

वसुधा पाटील यांनी कथा, कादंबरी, एकांकिका अशा विविध क्षेत्रात लेखन केले असून त्यांच्या कथेची जडणघडण पाहत असतांना त्यांना कथा लेखनास मिळालेली प्रेरणा ही मूळचीच असून त्या प्रतिभावंत लेखिका आहेत. त्यामुळेच त्यांनी साहित्याच्या विविध क्षेत्रातून प्रवास केला आणि मराठी लघुकथेच्या क्षेत्रात त्यांनी केलेला हा प्रवास नव्या पिढीतील लेखकांना प्रेरणादायी ठरेल असा आहे.

नवकथा लिहित असतांना वसुधा पाटील ही कथा लेखिका नि:संशयी वेगळी अशी आहे. नवकथाकारांच्या पिढीमध्ये वसुधाबाईंची कथा महत्वाची आहे. वसुधाबाईंनी व्यक्तिंच्या मनाचा शोध घेतला आहे. म्हणूनच, "वसुधा पाटील या

उल्लेखनीय कथा लेखिका आहेत."[8] असे म. द. हातकणंगलेकर म्हणतात. या लेखिकेला कलात्मकतेचे जितके भान आहे. तितकेच सामाजिक जाणिवांचे आणि सामाजिकतेच्या संदर्भात व्यक्तिगत सुखदु:खांचे परिपूर्ण भान आहे. त्यांच्या एकूणच कथा वाङ:मयामध्ये त्यांचे जीवनविषयक 'श्रध्दाशील' आणि 'भावनाशील' मन व्यक्त होतांना दिसते. त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण व त्यांच्या कथालेखनाची वैशिष्टये पाहत असतांना ' जनमुना के तीर' आणि 'वेगळी' यांचे विशेष पुढील प्रकरणाव्दारे अभ्यासता येतील.

वसुधा पाटील यांची साहित्यसंपदा लक्षात घेता मराठी साहित्यातील स्त्री लेखिकांच्या वर्गात त्यांचा म्हणावा तसा उल्लेख सविस्तरपणे आलेला नाही. झाला तो फक्त फुटकळ स्वरुपातच कथाकार म्हणून लघुकथाक्षेत्रात त्यांची कामगिरी नाही म्हटली तरी मोलाची आहे. म. द. हातकणंगलेकर, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. अंजली सोमण यासारख्या नावाजलेल्या समीक्षकांनी त्यांना मान दिला. पण त्यांच्या कथा क्षेत्रातील योगदान म्हणावे तसे विशेषत्वाने उल्लेखिलेले नाही. ते या प्रबंधिकेव्दारे मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

## संदर्भ


| अ. नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | प्रा. शिप्रमा पाटील | "वसुधा पाटील" यांची मुंबई येथे घेतलेली प्रकट मुलाखत, (गोरेगाव निवासस्थानी) दिनांक – ८ डिसेंबर १९९७ | |
| २) | पवार गो. मा. (संपा.) हातकणंगलेकर म. द. | मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप प्र. आ. १९०७ | १२९ |
| ३) | प्रा. शिप्रमा पाटील | "वसुधा पाटील यांची मुंबई येथे घेतलेली प्रकट मुलाखत, (गोरेगाव निवासस्थानी) दिनांक – ८ डिसेंबर १९९७) | |
| ४) | डॉ. सोमण अंजली | मराठी कथेची स्थितीगती प्र. आ. १९९५ | १३१ |
| ५) | डॉ. वडेर प्रल्हाद | आशय आणि अविष्कार प्र. आ. मार्च १९८८ | ११३ |
| ६) | कुलकर्णी अनिरूध्द अनंत | 'प्रदक्षिणा' खंड पहिला पुनर्मुद्रणे : १९८०, १९९३ | १९५ |
| ७) | फडके भालचंद्र | मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन प्र. आ. मार्च १९८० | ८९ |
| ८) | हातकणंगलेकर म. द. | मराठी कथा : रूप आणि परिसर प्र. आ. मार्च १९८६ | २५ |


...

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## प्रकरण तिसरे

## श्रीमती वसुधा पाटील यांच्या कथालेखनाची वैशिष्टये

नवकथेनंतर आणि विशेषत: १९६० नंतर लिहिल्या गेलेल्या नागरकथेचे स्वरूप पुष्कळसे पालटल्याचे दिसते. या काळातील मुख्य नवा घटक म्हणजे नागर स्त्रीसंबंधीच्या आधुनिक संवेदनशीलतेचे चित्रण होय. असे असले तरी आज कथेमध्यें ग्रामीण कथा, दलितकथा, नागरकथा असे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले आहेत. पण त्याचे अभ्यासाच्या सोयीसाठीच फक्त कथांचे वर्गीकरण करणे सोयीस्कर होईल. अन्यथा त्याचा वेगळा प्रवाह मानून सवतासुभा करणे अयोग्य ठरेल. "त्यासाठी लेखिकांचा वेगळा गट कल्पून त्यांच्या साहित्यावर लिहिणे फारसे उचित नव्हे, पण गुणवत्तेचा विचार बाजूला ठेवूनही असे विधान करणे शक्य आहे की बहुसंख्य लेखिकांच्या कथांना स्त्रीचा असा एक हळवा स्पर्श असतो."[१] ह्या सा-याचा विचार करता वसुधा पाटील ह्यांचे मराठी स्त्री कथेतील योगदान मोलाचे ठरते. वसुधा पाटील ह्या स्त्री लेखिका म्हणून त्यांचे वेगळ्या गटात वर्गीकरण करणे योग्य नाही. अभ्यासाच्या सोयीसाठी वसुधा पाटील यांचा एक स्त्री कथालेखिका म्हणून अभ्यास करणे गरजेचे वाटते.

वसुधा पाटील यांचे कथाविश्व स्त्रियांच्या अनुभवाशी निगडित आहे. स्त्रीयांचे जीवन व स्त्रीचे मन, तिचे प्रश्न, कुटुंब, त्यातील ताणतणाव, पुरुषप्रधान संस्कृतीला नकार देणारी स्त्रीची एक नवी प्रतिमा, स्त्री मुक्तीची स्वतंत्र संकल्पना त्यांच्या कथेतून साकार होताना दिसते. सरळ प्रवाही निवेदन व प्रामुख्याने व्यक्तिदर्शन हे त्यांच्या कथांचे स्वरूप आहे. आशय आणि अभिव्यक्ती हे त्यांच्या कथांचे सूत्र आहे.

वसुधा पाटील ह्यांनी सामाजिक, कौटुंबिक, बालमनावर प्रकाश टाकणा-या प्रेम, नव्या जाणिवा प्रकट करणा-या अशा विविध स्वरूपाच्या कथा लिहिल्या आहेत. 'जमुना के तीर' आणि 'वेगळी' या कथासंग्रहांच्या आधारे त्यांच्या कथावैशिष्टयांचे स्वरूप लक्षात घ्यावयाचे आहे.

१) सामाजिक कथा :

साहित्य आणि समाज यांची बांधिलकी आहे. समाज आणि साहित्य हे परस्परावर अवलंबून असतात. साहित्य समाज घडवत असते. आणि समाजातूनच साहित्याची निर्मिती होत असते. लेखक किंवा लेखिका समाजातील संस्काराचे अनुभव घेऊनच लेखन करीत असतात. वसुधा पाटील हयांचे संवेदनशील मन अशा समाजातील स्त्रियांचे प्रश्न, तिच्या समस्या, तिच्या जीवनातील घटना व घडामोडी तिच्या नव्या जाणिवा आपल्या कथेतून व्यक्त करतात. आपल्या समस्या आपणच सोडवून स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे धाडस करणारी स्त्री हे त्यांच्या कथेचे विशेष आहे. 'मनू' या कथेतील मनू अशीच आहे.

'मनू' या कथेतील मनू अबोल आहे. पण तिच्या डोळ्यातील विलक्षण ताकद मात्र बोलकी आहे. ऑफिसमध्ये नोकरी करत असून तिथेही नरमाईने वागत नाही. आपल्या भावंडांबरोबर किंवा आईवडिलांबरोबर कधी फिरायला जात नव्हती. ती एकलकोंडयासारखी राहात होती. ती कमवती व नैतिकमूल्ये जोपासणारी परिपूर्ण विचारसरणीची असल्याने तिच्या वडिलांनासुध्दा तिच्या पुढे हार खावी लागे – तिचे ऐकावे लागे. तिचा निर्णय म्हणजे पूर्ण विचार करून धरलेला एक मार्गच असायचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी ती चोखंदळपणे उलट-सुलट बाजूंनी पूर्ण विचार करण्याची तिची विलक्षण सवय होती. एकदा निर्णय घेतला की पाऊलही मागे हटायचे नाही. मग कितीही कष्ट सोसावे लागले तरी चालतील. हा तिच्या वृत्तीचा विशिष्ट पैलू होता.

'मनू' मुळे मीलनचं आणि मंगलचं लग्न रेंगाळले होते. पण तिला इतक्यात लग्न करून संसारात अडकून पडायचे नव्हते. पण आपल्या बहिणींनी आपल्याला जे वाटते ते मोकळेपणानं आपल्या वडिलांना सांगावे मग तो लग्नाचा विषय असेना का अशा विचाराची मनू आपल्या वडिलांच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हणते " म्हणण कांही नाही. पण मुलींना जरा मोकळे सोडा थोडे टक्के टोणपे खाऊ द्या – अनुभव येऊ द्यात – विचारांची देवाण घेवाण करण्याची संधी द्या.... माणसे जोडण्याची, तोडण्याची स्वतंत्र मोकळी वृत्ती

अंगी येऊ द्या त्यांच्या, मग आपल्या जीवनाचा जोडीदार त्यांच्या त्याच चांगला निवडतील."[२] ( मनू --, ' जमुना के तीर'- पृ.४८ ) हे ती एका दमात बोलते. नवविचारांनी भारलेली, स्वतःचे स्वतंत्र विचार असणारी व स्त्रीलाही आपला जोडीदार निवडण्यास पूर्ण स्वातंत्र्य असावे. अशा विचारांची मनू आपल्यासमोर उभी राहते. आपण वयाने मोठे असूनही लहान बहिणींना ती आडकाठी होत नाही.

मिलनसाठी आलेले स्थळ तिला पसंत नाही. कारण बापजाद्यांच्या कमाईवर छानछोकी करणाऱ्या पोरांना स्वाभिमान नसतो. कारण सतराशे फुलांवर प्रेम घेणारी भ्रमरवृत्ती त्यांच्यात असते. वसुधा पाटील यांनी उभी केलेली मनू पुरुषसंस्कृतीवर आक्षेप घेताना कचरत नाही. स्वतःचा जोडीदार स्वतः निवडण्याची तीची स्वाभिमाणी वृत्ती आहे. म्हणून घर सोडून जातांना चिठ्ठीत ती आपल्या वडिलांना लिहिते, " मी माझा जोडीदार निवडला आहे,पण अजून त्याची पूर्ण पारख झाली नाही. ती पूर्ण व्हायला अवसर मिळावा म्हणून मी त्याच्याबरोबर सहा महिने राहणार आहे. त्याला पारखून घेणार आहे - आणि मग विवाहाचं निश्चितं ठरवणार आहे. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा - मनू "[3] ( मनू - जमुना के तीर - पृ.५१ ) पण हे रुढ नितीला पसंत नाही.

परंपरेला छेदं देणारी मनू आपल्याला या कथेतून दिसून येते. आई-वडिल यांनी लग्न लावून दिलेल्याच मूलाबरोबर संसार करायचा ही जुनी परंपरा ती झुगारुन देते. पण तिचे दुर्दैव असे की ज्याच्यावर तिने प्रेम केले त्याच्यापासून तिला दिवस जातात. व तो एक दिवस अपघातात मरण पावतो आणि लग्न करायचे राहून जाते. आणि एका नव्या जिवाचा उदरात भार घेऊन लाजिरवाण्या अवस्थेत ती एकटीच परतते. तेंव्हा मात्र तिचे वडिल गलबलून जातात. आपल्या काळजाचा तुकडा असणाऱ्या पोरीवर रागवण्या-ऐवजी आपल्या लाडक्या ' मनू' च्या कपाळाचे चुंबन घेतात. आपली मनू

कपाळ करंटी, नतभ्रष्ट, अभद्र शीलाची कलंकिनी त्यांना वाटत नाही तर ती विशुध्द वाटते. कारण पापसुध्दा तिच्या छायेत यायला घाबरेल असे तिचे शांत व नितळ डोळे सांगत होते. ती शेवटी आपल्या बाबांना सांगते. " गेल्या सहा महिन्यांत इतकं कल्पनातीत सुख मिळालंय मला की, त्या शिदोरीवर सारं आयुष्य काढेन. पण ते सर्व मी एकटी करणार आहे."४ ( मनू - ज. के. तीर - पृ.५५ ) अशी ठाम भूमीका ती घेते.

आपल्या स्वत्वाच्या शोध घेणारी ही आधुनिक मनू ' स्त्री 'त्वाचा अर्थ अनेक अंगानी उलगडू पाहते. असे दिसून येते. स्वत:चा प्रश्न स्वत:च सोडविण्याची तिची खंबीर वृत्ती आणि तिने घेतलेला निर्णय लक्ष वेधणारा ठरतो. या कथेचा शेवट मात्र थोडासा कथेला भाबडेपणात बुडवून टाकणारा वाटतो. किंवा मनूचे कुमारी मातृत्व तिच्या व्यक्तित्वाशी विसंगत वाटते.

समाजात चांगली वाईट माणसे असतात. ' जहांगीर ' म्हणजे या विस्कळीत समाज व्यवस्थेचा बळी आहे. लोकांच्या मदतीला धावून जाणाऱ्या जहांगीरसारख्या व्यक्ती जशा आहेत. तशा दप्तरदारासारख्याही जहांगीरला मार देणाऱ्या व्यक्ती आहेत. ' गाणेवाला पंछी ' या कथेतून त्याचा प्रत्यय येतो. फोटोग्राफीच्या वेढाने पछाडलेल्या व त्या वेडापायी वडिलांचा धंदा सोडून आलेल्या एका कलंदर पारशाची कहाणी आहे.

' कुणी घर देता का घर - निवाऱ्याला खोली ' असे म्हणत तो लेखिकेच्या लहानपणी त्यांच्या घरी, शेजारी राहिला आहे. निर्मळ चारित्र्याचा, स्वछंदी व स्पष्ट बोलणारा जहांगीर हा पोपट आणि मैना या लहान मुलांशी मैत्री करतो. जहांगीर मैनाला ' गानेवाला पंछी ' असे म्हणत असतो. ' हाऊ डर्टी यू आर मैना '..... म्हणून तिला स्वच्छ ठेवणारा " हॅलो ! कमऑन पोपट मैना ! किती दिवस बीतले ! तुमची आमची मुलाखत जाली नाय ! "५ ( गानेवाला पंछी - ज. के. तीर - पृ.१८६ ) असे म्हणून जिव्हाळ्याने ममतेने वागणारा प्रसंगी पोपटला उचलून त्याचे पापे घेणारा, लिमलेटच्या गोळ्या देणारा हा जहांगीर लहानमुलांच्यात एकरूप झाला. आहे. मैनावर त्याचा

जीव आहे. मैना पोरांच्या घोळक्यात राहून शिव्या शिकते. ज्यावेळी जहांगीरच्या आई-वडिलांचा मैनाला राग येतो. त्यावेळी ती शिव्यांची सरबत्ती करते. पण मूलीने शिव्या देणें हे जहांगीरच्या वैचारिक बुध्दिला पटत नाही. म्हणून तो हसत हसतच म्हणतो, " साला, गांडू, हरामखोर हलकट,..... कोणाला कोणाला शिव्या देते तू मैना। पोरींनी शिव्या नाय धावा कंदी - तेतल्या तेत तूने तर बिलकूल नाय। तुझा नाम मैना हाय - याने गानेवाला पंछी। "[६] ( गानेवाला पंछी - ज. के. तीर - पृ. १९२ )

फोटोग्राफीचा धंदा करूनही तो घराचे भाडे देण्याइतपतही पैसे कमवू शकत नाही. त्याला दप्तरदाराकडे जेवावे लागते. तर दप्तरदाराकडे आलेल्या गरोदर महिलेला वाचवण्यासाठी मार खावा लागतो. असहाय्य, हतबल झालेल्या जहांगीरला वाडी सोडावी लागते. एका फोटोग्राफीच्या वेडापायी घरदार सोडलेल्या निर्दोष माणसाला समाज त्याच्या मनासारखे जगू देत नाही. हा या समाज व्यवस्थेचा दोष म्हणावा लागेल.

ही कथा आठवणींच्या स्वरूपात निवेदन केली आहे. व या ख-या आठवणी ' मी ' च्या लहाणपणातील आहेत. जहांगीरची कलंदर वृत्ती, अकृत्रिम स्नेह, व्यवहारी जगात होणारी त्याची कुचंबणा त्याच्या सहज वागणुकीने समाजात होणारे वेगवेगळे अर्थ, अशा विविध अंगानी ही कथा अर्थपूर्ण होत जाते. ' मी ' च्या निरागस वृत्तीला दिसणारा जहांगीर व मोठया माणसांना दिसणारा जहांगीर यांतून ते व्यक्तिमत्त्व अधिक अर्थपूर्ण होते. कथेचा पोत Romantic आहे. आणि अनुभवांशी निगडित असलेल्या सर्व घटकांचा एकसूत्र झाल्याने ही कथा विलक्षण प्रत्ययकारी ठरली आहे.

सारं दुःख पुसुन टाकण्याचे सामर्थ्य अब्दुल करिम खाँ च्या ' जमुना के तीर ' या रेकॉर्डस मध्ये असल्याचे गिरिजा आणि पुरुषोत्तमाला वाटते. भारतीय परंपरेतील आदर्श स्त्री चे चित्रण वेश्या व्यवसाय करताना देखील किती महत्वाचे आहे. हे गिरिजाच्या व्यक्ति रेखेतून साकार होते. वेश्या व्यवसाय करणा-या

स्त्री मनाला समाजात स्त्री म्हणून जगावे वाटते. पण समाज तिला आपल्या क्रूरवासनेपोटी तसे जीवन जगू देत नाही. त्यामुळे विषन्न होणारी गिरिजा वसुधा पाटील यांनी रेखाटली आहे.

आजची संध्याकाळ आणि पूर्ण रात्र गिरिजाच्याच हाती होती. कुणाबरोबर अपॉईंटमेंट नव्हती. चुंबणाची देवाणघेवाण करीत रमतगमत चांदण्यातील किरण नव्हते. घरी परतल्यावर रात्री एकही दिवा ती लावणार नव्हती. कारण रोज रात्री कितीतरी दिवे पेटलेले असतात. दाल-नातून अनावृत्त शरीर हिंदकळत असतात. अस्फूट आवाजात किंचळतात, कुणाच्यातरी बहुपाशात घटट वेढले जातात. अखेर सारी धावपळ, सारे कृतकोप, सारा लडिवाळपणा, सारा अनुनय अखेरच्या त्या एकाच उत्कट बिंदूशी विलीन करताना, रात्र प्रहरच्या प्रहर दिव्यानी जागत राहत - पहारा करते. वर्षानुवर्ष म्हणून आज गिरिजाने ठरविलेले असते " आज रात्रीच्या पाहा-यातून निसटायचं आणि अंधारात लपून बसायचं. आपल्या स्वतंत्र शयनागृहात. आणि डोळे मिटून शांतपणे ऐकायचं, जमुना के तीर .... जमुना के तीर...."[७] ( ज. के. तीर - ज. के. तीर - पृ.२१८ ) आणि गिरिजा आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करते. पण तिला कांहीच आठवत नाही. पण अचानक अंगावर नको त्या वेळी पडलेली गिधाडासारखी क्रूर झडप आठवते.

हाव आणि मोह यामुळे दर रात्री अब्रू गहाण ठेवण्याचा धंदा पण तोही एका खास पध्दतीने करण्याचा प्रयत्न गिरिजा करते. त्यातही पैशाचे आणि देहाचं मोल तिने जोखून घेतलेलं असतं. स्वतंत्र प्लॅट, चोखंदळ नजरेन. पारखलेलं गि-हाईक त्यामुळे फालतू माणसांना तिच्याकडे थारा नाही. ओळखीशिवाय परवाना नाही. गिरिजा वेश्या जरूर आहे पण " धंदाच करायचा पण तो आब राखून : शानदार पध्दतीनं। विशिष्ट पातळीत. पैशानाही मोल देहांचही तेवढच मोल आणि वृत्तीही ताजव्यात जोखून घेतलेल्या. फुकापासरी वाहयातपणाला, छचोर उद्दामगिरीला इथं तसूभर जागा

नाही. एवढी सारी कवचं भेदून जो शिरकाव करील त्याच्याशीच केवळ सारे भेदभाव विसरून निर्मळपणे नितळ व्यवहार साधायचा आणि सौदा विसरायचा सारचं विसरायचं. अथपासून इतीपर्यंत - "[८] ( ज. के. तीर - जे. के. तीर - पृ. २१९ ) भारतीय संस्कृतीतील स्त्री जसं आपल्या पतीशी एकनिष्ठ राहते. पती हाच परमेश्वर मानते. तशीच वृत्ती या गिरिजाची आहे. यातून एखादा रोग होईल याची ती फिकीर करीत नाही. पण येणा-या भेसूर वार्धक्याची तिला चिंता वाटते. व शेवट कुणाच्या सानिध्यात ? असा प्रश्न मात्र तिला पडतो.

या कथेतील पुरूषोत्तम हा फक्त नावाचाच पुरूषोत्तम आहे. प्रत्यक्षात तो साधा पुरूषही नाही. त्याच्याकडे असणारी न्यूनता यामुळे तो मनाने खचलेला आहे. विवाहापूर्वीच त्याच्याबरोबर लग्न ठरलेल्या मुलीला सर्व कांही खरेखुरे सांगून तिला लग्नापासून परावृत्त केले आहे. डॉक्टरांच्या '' हिंम्मत ठेव आणि सारे जग धुंडून एक सुंदर स्त्री मिळवून आण '' या सांगण्यावरून तो अखेर गिरिजाकडे आपले गेलेले पौरूष मिळविण्यासाठी येतो. ' मनकवडया आहात तुम्ही ? ' या प्रश्नाला उत्तर म्हणून गिरिजा म्हणते " तिशी ओलांडण्याची वेळ येत चालली आहे. नादानापासून पुरूषोत्तमापर्यंत सारे नमुने जवळून पाहिले आहेत. तेंव्हा माझ्या सारखीला यात ओळखता नं येण्यासारखं काय आहे "[९] ( ज. के. ती. - ज. के. तीर - पृ. २२२ )

पुरूषोत्तमाचे दु:ख गिरिजाला आगतिक व असाहय वाटते. त्यांच्यातील प्रामाणिक व भोळ्या पुरूषाला मदत करण्याचा ती निश्चय करते. त्याचे दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करते. या पुरूषोत्तमाला आपल्या सुखदु:खात आपलेपणाने सहभागी होणारी मैत्रीण हवी आहे. पण अशी मैत्रीण पुरूषोत्तमाला मिळणे अशक्य आहे. त्यासाठी तो अस्वस्थ झाला आहे. हे सारे मनमोकळेपणाने गिरिजासमोर व्यक्त करतांना त्याचं सारं शरीर हुंदक्यांनी गदगदून येते. गिरिजाची खात्री पटते. तिलाही कढ आवरेनाशी

होतात. आवेगानं त्याला जवळ ओढून, ती त्याच्या कपाळाचे दिर्घ चुंबन घेते, आणि हळवेपणाने म्हणते - " पुरुषोत्तम तुमचे दु:ख दूर करण्याचा मी मनापासून प्रयत्न करीन. माझं घर तुम्हाला मोकळं आहे. कैव्हाही या मन मानेल तेवढे दिवस रहा. मी तुमच्या संगतीत राहीन. शक्य असेल तितके जवळ येण्याचा प्रयत्न करीन मला वाटते, पुरुष नसूनही तुम्ही पुरुषोत्तम आहात. मला तुमची मैत्रीण व्हायला आवडेल. "१० ( ज. के. तीर - ज. के. तीर - पृ.२२७ )

दर सोमवारी उपास करून शंकराची पूजा करणारी एक श्रेष्ठ तारांगना म्हणून या गिरिजाचा उल्लेख करावा लागेल. तर गिरिजा ही एक तारांगना असल्यामुळे तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण घृणास्पद आणि तिला जीव नकोसा वाटावा असाच आहे.

देहविक्रय करणाऱ्या गिरिजाकडे पुरुषोत्तम हा पौरुष हरवलेला पुरुष येतो. व त्याला पौरुष देण्यासाठी मनापासून तयार होणारी गिरिजा ही एक विलक्षण स्त्री आहे. कथेच्या शेवटी गिरिजाने केलेले प्रयत्न यशस्वी ठरतात. व गिरजाच्या घट्ट बाहुपाशात पौरुष मिळविलेला पुरुषोत्तम पाहावयास मिळतो. पुरुषोत्तमाला सुख दिल्याने व मनापासून प्रेम करण्याने गिरिजाच्या ठिकाणी असणारी भारतीय परंपरेतील आदर्श स्त्रीची लक्षणेच दिसून येतात. प्रेम म्हणजे स्वत:ला विसरून दुसऱ्याला जितके देता येईल तितके देणे हे गिरिजा व पुरुषोत्तमाबाबत दिसून येते. ' जमुना के तीर ' हे शीर्षकही यथार्थ व मार्मिक वाटते.

परपुरुषाकडे पाहणे म्हणजे पाप आहे. याचे दर्शन निर्मलेच्या व्यक्तिरेखेतून वसुधा पाटील यांनी ' मानिनी ' या कथेतून घडविले आहे. पती आणि पत्नी यांच्यातील संघर्ष, ताणतणावाचे उत्कट दर्शन येथे घडते. निर्मला आणि विभाकर यांचा संसार सुखाचा होता. पण विभाकरच्या विकृत, संशयी आणि निष्ठूरवृत्तीमुळे निर्मलेला घर सोडावे लागते.

अत्यंत प्रेमळ आणि स्नेहशील पती - पत्नींच नातं कायदयाच्या व संपत्तीच्या बळावर तोडले आहे. दोघातील संघर्षाची तिला जाणीव आहे. विभाकरने केलेल्या अपमानामुळे गेली सात वर्षे ती पत्रव्यवहार टाळते. आठ वर्षापूर्वीची निर्मला आणि आत्ताची निर्मला काळाने दोघींची एकमेकांपासून फारकत केली आहे. निर्मलेचं बंदिस्त मन कठोर बंधन आताशा मोडू पाहते आहे. बाहेरच्या जगाशी व्यभिचार ठेवणे तिच्या आवाक्या बाहेरचे आहे. म्हणून आता ती आगतिक होऊन पत्र लिहिते. " माझा कांही दोष नसताना आततायीपणा करून, तुम्ही माझा मनोभंग केलात आणि तेजोभंग करण्याचा प्रयत्न केलात. पण तो मात्र तुम्हाला मी साधू दिला नाही. मी मानिनी होते विभाकर. त्यावेळी होते. आताही आहे. पुढेही राहीन. "१२ ( मानिनी- ज. के. तीर-पृ.८२ )

नव-याच्या अपमानामुळे निर्मला घर सोडते. आणि स्वत:चा स्वाभिमान सांगते. स्वत:ला मानिनी समजते पण एक दिवस तरी दिलीपसाठी विभाकरने आपल्या घरी यावे अशी भाबडी अपेक्षाही ठेवते. नकळतपणे तिचा नव-याविषयीचा आदरच येथे व्यक्त होतो. तिचा एकुलता एक मुलगा जो तिच्या काळजाचा तुकडा असतो. पण तोही दैव हिरावून नेते. असहाय्य, अगतिक झाली आहे. दैव कुणाची पर्वा करीत नाही. त्याला कुणाचे सोयरसुतक नसते. म्हणून ती म्हणते - " आता मी खरोखरच एकटी आहे. शून्यमानाने ग्रासलेली, रित्या घराने गिळायला घेतलेली एक अनाथ, पराजित केलेली. दैवाच्या लेखी मानिनी आणि अवमानिता सारखीच. "१२ ( मानिनी - ज. के. तीर - पृ. ८४ ) दैव आपले उद्दीष्ट साध्य करून दैवच आपली फरफट करीत आहे असे माननारी.

दिलीप गेल्यानंतर कलाहीन व चैतन्यहीन झालेले घर तिला भुतासारखं गिळंकृत करायला पहातंय असे वाटून तिचे मन आक्रोश करते. दिलीपला परत आणता येत नसेल तर त्याच्याच रक्ताचा भाऊ अथवा बहिण आणता येईल का ? गोठून गेलेली मातेची अमर्याद भावना पुन्हा चैतन्यशील करण्यासाठी पुन्हा माता होता येईल का ? असे अनेक प्रश्न तिला वेड लावतात. तेंव्हा तिचे मन टाहो

फोडून आक्रंदून सांगत आहे " निर्मले, तू पुन्हा एकदा आई हो। कोवळ्या लुसलुशीत ओठांनी तुझ्या स्तनाला स्पर्श करताच तुझं दुःख लागलीच कमी होईल. झरझर दुधाच्या धारा तुझ्या पाडसाच्या मुखी पडताच तुझ्या डोळ्यातील आसवांच्या धारा आपोआप कमी होतील "[१३] ( मानिनी- ज. के. तीर - पृ. ८५ ) तेव्हा आई ही मानिनी आपला मान बाजूला ठेवून नव-यापाशी याचना करते. पुन्हा आई होण्यासाठी दुसरं लग्न करणे तिच्या स्वप्नातही नाही. दुस-या परपुरुषाकडे ती अशी याचना करु शकत नाही. कारण ती मानिनी आहे. म्हणून ती म्हणते. " दैवापुढे आगतिक होऊन तुमच्यासारख्या कठोर पुरुषापुढे, ज्याने माझा अपमान करुन माझ्या व्यक्तित्वाला डंख मारला, त्या पुरुषापुढे पदर पसरुन याचना करीत आहे. मला पुन्हा एकदा तुमच्या मुलाची आई होण्याची संधी द्या "[१४] (मानिनी ज. के. तीर - पृ. ८६ )

अमेरिकेसारख्या देशात स्त्रिया पती बदलतांना दिसतात पण भारतीय संस्कृतीची मूल्य जोपासणारी वसुधा पाटील यांची निर्मला मानानेच जगणारी आहे. प्रसंगी निष्ठूर, संशयखोर पतीशी तडजोड करते. मात्र परपुरुषाचा विचार तिला स्वप्नातही शिवत नाही. यातच ती मानिनी ठरते.

समाजात अनेक परिवर्तने होत असतात. समाज बदलतो पर्यायाने समाजातील माणूसही बदलतो. माणसांचे विचार बदलतात पण नमूचे वडिल मात्र बदलले नाहीत. नव्या विचारांची नमू बदलत्या पिढीचे प्रतिनिधित्व आहे. सुख, दुःख यश अपयश माणसाच्या वाटयाला येतच असते. याचा प्रत्यय ' अपेशी ' या कथेतून घडतो.

' अपेशी ' ही कथा एका निग्रही मुलीची शोकांतिका व्यक्त करते. चिमुरडया नमूने शाळा, स्वयंपाकघर, शिवणकाम हा सारा व्याप उरकला होता. इतर सामान्य मुलींप्रमाणे आपण नाही हा नवीन कोंब तिच्या

सत्वाच्या उबदार जाणिवेतून फुटला होता. म्हणून आपण जे करू ते मिळवू असा तिच्या मनाचा विश्वास आहे. स्वत:कडे आकर्षक मनोवेधक काही नसताना मोठया आशा आकांक्षा मनात बाळगून ती आपल्या वेगळयाच व्यक्तित्वात गुरफटून गेली होती. मॅट्रिकला अडुसष्ट टक्के मार्क मिळाल्यावर स्कॉलर शिपवर माझे शिक्षण होईल तेव्हा माझं नावं कॉलेजात घाला असे ती आपल्या बापूंना म्हणाली होती. पण " मॅट्रिक पास झाल्यावर मिळालेल्या भरघोष यशांत फार मोठे अपयश दडून बसलं होते, याची तिला कल्पनाही नव्हती. "[१५] ( अमेशी – ज. के. तीर – पृ. ९२ )

' नमू ' ची पुढे शिकण्याची इच्छा आहे. पण परिस्थितीच्या विळख्यात सापडलेले तिचे वडिल तिच्या लग्नाचा विषय काढतात. ' नमू ' मात्र आपले स्वतंत्र विचार मांडून लग्नास स्पष्ट नकार देते. घरात ताण-तणावाचे वातावरण निर्माण होते. वडिलांचा संताप त्यामुळे नमू वडिलांच्यात संघर्ष निर्माण होतो. यामुळे घरात कुणालाही न जुमानता घर सोडते. आलेला संताप व कड मुकपणाने गिळून टाकते. दुरच्या मावशीकडे राहावयास जाते. बदलत्या काळात, अपु–या उत्पन्नात, संयम न ठेवता तीचे वडील ज्या पध्दतीने वागतात त्याचे फळ म्हणून तिला आणखी एक लहान भावंड होत. याची तिला चीड येते.

' विश्वास कुलकर्णी ' व ' नमू ' चे प्रेम असते. पण विश्वासने खोटया सबबी सांगून तिला अवहेरलं होतं. तिला फसवलं होत... विश्वासने लग्न मोडल्यामुळे नमूची ऑफिसभर नाचक्की होते. तिला अपमान सहन करावा लागतो. ती बी. ए. होते. भांवडासाठी खूप करावसं वाटतं फक्त वडील यावेत त्यांनी ' नमे घरी चल ' असे म्हणावेसे वाटते. पण सतत अपयश तिच्या वाटयाला येत राहते. वडील एक दिवस येतात पण तिला अवलक्षणी व बदचालीची म्हणून जातात.

सर्वत्र ' नमू ' ची फरफटच होते. ज्या विश्वासवर तिने प्रेम केले. त्याच्यावर ती अजूनही जीव लावून आहे. ज्याच्याबरोबर प्रणयाचे मनसोक्त खेळ ती खेळली होती. तो तिला हवा होता. पण ते स्वप्नच राहिलं होतं. भास्कर तिचं स्वप्न पूर्ण करु शकत नव्हता. कारण भास्करने ऑपरेशन केल्याचे त्याच्या बायकोकडूनच कळलं होते. आणि जसं तिचं विश्वासवर प्रेम होतं तसं भास्करचं त्याच्या बायकोवर होतं. हुशार, बुध्दिमान असणारी नमू काहीही मिळवू शकत नाही. म्हणून संपूर्णत: अपेशी ठरलेली नमू शेवटी एक निर्णय घेते. " आयुष्यभर हे असचं राहायचं, पण लग्न करायचं नाही. कधी कुणाशी. प्रेम करायचं विश्वासवर नि शरीर द्यायचं भास्करला. "[१६] ( अपेशी - ज. के. तीर - पृ. १०४ ) पण कुत्सित नजरांचा मारा सहन करत स्वत:च्या कर्तबगारीवर जगायचं ती ठरवते.

खाडिकरांच्या कांही कथेतून दोन पिढयातील संघर्ष जाणवतो. तोच संघर्ष ' अपेशी ' कथेतून जाणवतो. जुनी पिढी व नवी पिढी यांच्या विचारसरणीमध्ये तफावत असते. जुन्या विचारांनी भारलेले, जुनी मूल्ये अंगिकारलेले नमूचे वडील आहेत. आपल्या सांगण्याप्रमाणे नमूने वागावे अशी त्यांची इच्छा आहे. पण नवमूल्यांनी भारलेली, शिकावे, स्वत:च्या पायावर उभे राहावे घराला सावरावे असे नमूला वाटते. नव्या पिढीतील अनेक तरुणींचे प्रतिनिधीत्व म्हणजे ' अपेशी ' मधील ' नमू ' होय. आधुनिक नागर, सुशिक्षित स्त्रीच्या भावविश्वाचे एक वेगळे रुप वसुधा पाटील यांच्या कथेतून व्यक्त होते.

' लेबल ' या कथेचा नायक श्रीनाथ दुरदृष्टीचा, संयमी व अंत-र्मुखवृत्तीचा आहे. वडिलांच्या बरोबर घरात त्याचे खटकत असे. वडील त्याला सतत दोष देतात. पण संयमी वृत्तीमुळे तो कधी कुणालाच दोष देत नाही. आई गेल्यावर श्रीनाथ पोरका होतो. घराची सर्व जबाबदारी त्याच्यावर पडते. स्वयंपाक घरापासून ते धाकटया भावाचा अभ्यास, पेपर लाईन सांभाळणें इत्यादी कामे त्याला करावी लागतात. तो जिद्दी असल्यामुळे

13302
A

पार्ट टाईम नोक-या, चहासाबणाची घरोघर विक्री, आणि शिकवण्या सांभाळून तो बी. ए. होतो. आई गेल्यावर आईला दिलेले वचन पाळण्यासाठी तो धडपडत असतो. लहानपणी एका शिक्षकांनी दिलेले विचार, संस्कार, त्याचे ऋण तो मानत आला होता. त्याच्या दु:खात सहभागी होणारी अंजनी नावाची मैत्रिण कचेरीत असते. दोघांचे एकमेकांवर प्रेम असते. पण स्वत:च्या कुटुंबाच्या सुखासाठी श्रीनाथ आपल्या प्रेमाचा त्याग करतो.

श्रीनाथची धाकटी बहिण अकरावीत असतांना शेजा-यांकडे शिकायला जात असते. शेजा-यांच्या मुलाला मोह आवरत नाही. एक दिवस पाय घसरतो. मुलगा घाबरून पसार होतो. श्रीनाथ त्याचा शोध घेतो पण एका कनिष्ठ जातीच्या , अत्यंत सामान्य दरिद्री तरुणाशी आपल्या मुलीचा विवाह करण्यास वडील सक्त विरोध दर्शवितात. त्या तरुणाच्या सरळ, भाबडया प्रामाणिक स्वभावामुळे श्रीनाथ बहिणींच्या संमत्तीनेच तिच्या हितासाठी शेजारच्या घराशी सोयरीक जूळवितो. श्रीनाथाने इथे जाती - पातीचा विचार केलेला नाही. पण एका घरात राहून बाप लेक बोलत नाहीत. सारं दुर्दैव खरोखर जिच्या वाटयाला येणार होतं ती मात्र सुखी होती.

श्रीनाथाने जाणत्या वयाच्या सुरुवातीलाच एक आयुष्याचा आराखडा तयार केला होता. म्हणून लग्न झाल्यावर एकत्र राहण्यात कोणतंच सुख नाही असे तो अंजनीला सांगतो. शेवटी वडिलांनाही खात्री पट ली होती की आपलं खरं नातं म्हणजे आपला थोरला मुलगाच आहे. पण श्रीनाथ आता बदलू पाहात होता. त्याच्या आखलेल्या आराखडयावर काही रेषा अजून शिल्लक होत्या. आपल्या तल्लख बुध्दिचा ह्याने वापर केला होता. नको ते गुण अवगुण मोठया शिताफीने वापरून आपला मार्ग रेखीव करून टाकला होता. त्यासाठी त्याने योग्य ती गि-हाईके हेरली. आणि आपल्या मोक्याच्या जागेचा दुरुपयोग करून स्वत:ला हवी तेवढी संपत्ती यशस्वी रितीने जोडली होती. भरपूर पैसा, हवेशीर जागा, मोटारी, रसिल्या छोक-या होत्या. पण अंजनीसारखी बायको मात्र त्याला नव्हती. मास्तरांनी पूर्वी जे दिलं

होतं ते आजही धरून ठेवायला पाहिजे होते असे त्याला वाटू लागले हे ऐशआरामी जिनं त्याला नको वाटत. " शिंप्याने तीस रुपये किंमतीचं लेबल मारून फ्रॉक विक्रीला मांडला आहे. पण अडीचवार पॉप्लिन दुस-याचं चोरलेलं आहे, या जाणीवेने मन सतत जसं पोखरून काढावं तसच श्रीनाथचं झालं आहे. सुखही त्याला काटयासारखं सलंत आहे. "[१७] ( ज. के. तीर - ' लेबल ' - पृ. १८१)

कांही कथालेखिका मध्यमवर्गीय अथवा उच्च मध्यमवर्गीय आणि कांही उच्चभ्रू संस्कृतीची जमणूक करतात. कलावंताची वर्गनिष्ठा आणि वर्गीय-वृत्ती यांच्या कलाकृतीतून प्रतिबिंबित होत असते. म्हणून लेखिकांच्या कथा-विश्वात विद्यमान काळातील स्त्री जीवनाचे यथातथ्यदर्शन घडावे ही अपेक्षा असते. आणि असे दर्शन वसुधा पाटील यांच्या कथातून घडते . " वसुधा पाटील ही कथालेखिका सुमा करंदीकर, गिरिजा कीर यांच्यापेक्षा वेगळी आहे. या लेखिकेला कलात्मकतेचे जितके भान आहे तितकेच सामाजिक जाणिवांचे आणि सामाजिकतेच्या संदर्भात व्यक्तिगत सुखदु:खांचे परिपूर्ण भान आहे. "[१८] असे सदा क-हाडे म्हणतात.

' भिंती ' ही कथा सर्व वैशिष्टयांची प्रतिनिधिक म्हणता येईल. जातिभेदाच्या भिंती कोसळत आहेत असे आपल्याला वरवर वाटते, पण या भिंती अद्यापही भक्कम आहेत. या भिंतीआड ज्यांचा कोंडमारा होतो. त्यांचे श्वासही कित्येकदा ऐकू येत नाहीत. जातीधर्म माणसांना मुळापासून उखडणारे, एकमेकांपासून कायम तोडणारे होऊ नयेत असा संदेश या कथेतून व्यक्त होतो. पिचलेल्या माणसांचा एकच कडवटपणाचा धर्म, एकच जात, पिडलेल्यांचे एकच लिंग माणूस. पण त्यांच्या आयुष्याची सारी लक्षणे मात्र जनावरांच्या जातीची, सगळी बुध्दी कुंठित व्हावी, भावना जळून कोळ व्हाव्यात, ओलावा शोषून निपटून जावा, बरंवाईट यातलं तारतम्य विरघळून जावं असे ज्युलियाच्या नोकरीतील अनुभव आहेत. ती ज्या ठिकाणी

नोकरी करते. त्या ठिकाणी अशा समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले जातात. शालिनीचे लग्न जातीमुळे जमत नाही. ' जात ' हीच ' भिंत ' सर्वांच्यामध्ये उभी आहे.

जातीधर्म, मुलींचे लग्न, मुलींच्या नोकरीचा प्रश्न इथे उभा राहातो. कारण नोकरी टक्केवारीवरून मिळत नाही तर अलिकडच्या काळात ओळखीची टक्केवारी ही अधिक फलदायी ठरते. अशासारखे अनेक सामाजिक प्रश्न वसुधा पाटील या कथेतून मांडतात. या कथेतील ज्युलिया सारखे जे जातीची कोंडी फोडणारे हास्यास्पद ठरतात, इतकेच नव्हे तर समाजातून जवळजवळ बहिष्कृत केले जातात. ज्युलिया केरळी ख्रिश्चन आहे ती केदारखना या पंजाबी हिंदूबरोबर प्रेमविवाह करते. लग्नानंतर त्याला त्याचं घर वर्ज्य ज्युलियाला माहेरचे दरवाजे बंद. दोघांनाही नोकऱ्या आहेत. म्हणून संसार व्यवस्थित उभा आहे. " जीझस झाला काय, बुध्द झाला काय, सर्वांनी इथे साष्टांग नमस्कार घालावेत. अशी इथली सर्वांची परिस्थिती. अनुभवासारखे या जगात योग्य शिक्षक नाहीत. कुणी उत्तम शिक्षण देणारे. "[१९] ( भिंती-वेगळी – पृ. ८ ) कारण माणूस अनुभवानेच शहाणा होत असतो. ज्युलिया अनुभवानेच शहाणी झाली आहे. म्हणून ती शहाणपणाने तिच्या जाती विषयी विचारते. पण अलिकडच्या काळात असं जाती विषयी विचारणं असमंजसपणाचं लक्षण ठरतं. आणखी हा एक वेगळा अनुभव तिला येतो.

समाजपरिवर्तन, समाजसेवा करणारा सोनवणे हा तरूण स्वत: जातीने महार असूनही तो आपल्या विधवा बहिणीला चांभार जातीतील सुशिक्षित सरकारी नोकरी करणाऱ्या बुध्दिमान ऑफिसरला आपली बहिण देवू इच्छित नाही. जाती पोटजातीची बंधने एका विशिष्ट मानवी प्रवृत्तीमुळे इथल्या समाज व्यवस्थेमुळे अजुनही खिळखिळी होऊ शकत नाहीत. शालिनी ही या लग्नाला विरोध दर्शविताना म्हणते, "कितीही शिकला म्हणून काय झालं. संस्कार कांही पुसत नाहीत. त्याचे आईवडिल, भावंड.... घरी काय काय

करत असतील देवजाणे गावी ढोरं फाडणारे धेड मी पाहिलेत. त्यांच्या सारख्यांच्या घरी संसार नको गं बाई – त्यापेक्षा आहे ते आयुष्य बरयं"[२०] ( भिंती – वेगळी – पृ. १२ ) असा स्पष्ट निर्वाळा देते.

सोनवणे कार्यकर्ता आहे. कार्यकर्त्यानं संतापून चालत नाही. समजुतीचा मार्ग विसरून चालत नाही. मानवी जीवनात नैतिक प्रगती झाली सर्व जगाची ओळख पटू लागली, सर्व ज्ञानाची भांडारे खुली झाली पण धर्मांच्या विळख्यातून मानवाची सुटका झाली का ? असा प्रश्न उपस्थित होतो. कारण महार तो महारच आणि चांभार तो चांभारचं, धेड तो धेडच हा विचार करणारी ज्युलिया सोनवणेला म्हणते, " हे बघ, मी आहे ख्रिश्चन माझा नवरा आहे पंजाबी ब्राम्हण, आणि तरीही आमची मुलगी एवढी मोठी असती तर निश्चित आम्ही ती घाटगेला दिली असती."[२१] ( भिंती – वेगळी – पृ. १९ ) ज्युलिया उत्तम समाजसेविका म्हणून उल्लेखनीय वाटते.

मानव कामानिमित्त एकत्र आला, भावनिक पातळीवर एकरूप झाला. पण एकमेकांना सहानुभूती मिळते ती फक्त दये पोटी. मानवाचे खरे नाते जेंव्हा प्रस्थापित व्हायची वेळ येते तेव्हा पुन्हा जातीधर्माचा विचार होतो. म्हणून प्रत्येक जणजातीच्या भिंती तोडल्याऐवजी जातीच्या भिंती घटट करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणून ज्युलिया म्हणते " अखेर जात काय, धर्म काय आपल्यासाठीच असतात. आपण त्यांच्यासाठी नाही. आपण सगळे एक असलो की, सर्वांची जात पण एक, निधर्मही एकच. "[२२] ( भिंती – वेगळी – पृ. १९ ) सोनवणे तुम्ही जर तुमच्या पुरतंच पहाणार तर सवर्णांनी आपल्यापुरतंच पहावे. तुम्हाला सर्व सवलती आहेत त्याचाच फायदा करून घ्यावा हवं तर. अशी जाणिव ज्युलिया त्याला करून देते.

भारतीय समाजामध्ये जातीच्या भिंती घटट आहेत याचे उदाहरण म्हणून ' वेगळी ' या कथासंग्रहातील एक वेगळा समाज परिवर्तनाचा वसा घेऊन सामाजिक कार्याला वाहून घेतलेली ज्युलिया दिसते. जातीचे संस्कार पुसत

नाहीत. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये जातीची बंधने इतकी घट्ट आहेत की त्यांना परिवर्तनाचा विचार कळत असूनही वळत नाही. अजूनही जातीच्या भिंती घट्ट असून त्या पाडल्याशिवाय फुले, शाहू, आंबेडकरांचे समता, बंधुता, न्यायाचे तत्वज्ञान मानवापर्यंत पोचणार नाही. आणि हे विचार समजण्यासाठी पुन्हा एकदा या विचारवंतांचे विचार प्रत्येकाने अंगिकारले पाहिजेत. आणि अशा समाजव्यवस्थेत वावरणारी ज्युलिया शेवटी बुध्दिजीवी असूनही हतबल ठरते. व सदोष समाज व्यवस्था घाटगेला शेवटी उपेक्षितच ठरविते.

एक आगळं वेगळं व्यक्तिमत्व असलेल्या स्त्रीचे हृदयस्पर्शी वर्णन 'वेगळी' या कथेतून व्यक्त होते. वेगवेगळ्या व्यक्तिंचे स्वभावरेखाटन करण्यात वसुधा पाटील यशस्वी झाल्या आहेत. या कथेतील नायिका स्वतंत्र विचाराची जिद्दी पण नियतीच्या फे-यात अडकून कांही काळ खचलेली दिसते. कथेच्या शीर्षकाप्रमाणेच 'वेगळी' असणा-या स्त्रीचे शोकांतिक वर्णन वाचकांच्या मनाला चक्रावून सोडणारे आहे.

ललिता लहानपणापासूनच पाण्यावरल्या तेलाच्या लहानशा थेंबासारखी वेगळीच राहिली आहे. लहानपणापासूनच सैनिकांविषयी आदर व जिव्हाळा तिला आहे. म्हणून नोकरी लागल्यावर अपंग सैनिकांच्या मुलाना शिक्षण किंवा सैनिकाच्या विधवा बायकोंना मदत करण्याचे वर्गात बाईंना सडेतोड उत्तर देते. सैनिक हा तिचा जीव की प्यार होता. म्हणून जवान हा भिका-यासारखा नसावा असे तिला वाटते. आचरट पणानं भरलेला सिनेमा पाहण्यापेक्षा ती अप्रतिम युध्दचित्रपट पाहते. पुस्तकावर जीवापाड प्रेम करते. ललितेला आई नव्हती पण सारं घर ती सांभाळीत होती. इतर मुली सिनेमा, नटनट्यांची लफडी, सिने संगीत. इत्यादी विषयावर बोलत पण ललिता हे सगळ डावलून होती. पोहणं, सायकलिंग, बॅडमिंटन यात तिला रस होता. कॉलेजची मुलं तिची छेड काढायची तिच्याबद्दल वाह्यात बोलायची. एक दिवस एकाच्या फाडकन सणसणीत मुस्काडीत ती ठेवून देते. सारेजण चकित होतात.

त्यावेळी ती म्हणते, " बेशरम नुसती इकडे देश एका मोठया लढाईतून नुकताच बाहेर पडलाय नि तुम्ही कॉलेजमध्ये शिकत असूनही बेशरमपणे गालोळ्या बघायला आसुसलात काय नालायक शेणात वळवळणारे किडे कुठले. "[२३] ( वेगळी - वेगळी - पृ. १२९ ) कारण ललिता चाफयाचं फुल नाही तर जास्वंदीची शिमटी आहे.

सर्व कथाभर 'मी ' हे सर्वसामान्य स्त्री चे प्रतिक आहे. जुन्या मूल्यांचा अंगिकार केलेली. जुनी संस्कृती जपणारी पण दुस-या बाजूला ललिता ही स्वतंत्र विचारांची जुनी मूल्ये - झुगारून देऊन स्वत:चे विचार ठामपणे मांडणारी आहे. शिक्षकानी लिहून दिलेले भाषण ती वक्तृत्व स्पर्धेत सादर करत नाही, तर सैन्याविषयी अभिमान ती व्यक्त करताना म्हणते , " एखाद्या सैनिकाशी लग्न करून त्याचा अस्थिर संसार सुखाचा करावा, त्याच्या शूर मुलांना जन्म द्यावा, आणि माझ्या शूर मुलांची मुलं, म्हणजे माझी पराक्रमी नातवंड पाहून अखेर प्राण सोडावा - ही माझी सुखी जीवनाची कल्पना आहे. " [२४] ( वेगळी - वेगळी - पृ. १३१ ) असे आपले स्पष्ट मत मांडते.

ललिता एक स्वतंत्र विचाराची स्त्री असल्याने लग्नाविषयीच्या तिच्या कल्पना वेगळ्या आहेत. चिमणीच्या घरट्यातला चार चौघींसारखा संसार करणा-या सामान्य स्त्रियांसारख्या तिच्या कल्पना नाहीत. पती म्हणून एक पराक्रमी मर्द पुरुष तिला हवा आहे. गर्विष्ठ, ताठर, भलताच स्वाभिमानी बायकोचे लाड पुरविणारा, तिचे अनुकरण करणारा पती तिला नको आहे. आपल्या देशासाठी, समाजासाठी त्याग करणारा पती तिला हवा आहे. लाथ मारेल तिथे पाणी काढणारा आणि देशासाठी कोणतीही कुर्बानी करायला प्रसंगी प्राणांची बाजी लावणारा पुरुष तिला हवा आहे. म्हणून जगावेगळी जाहिरात देऊन ती अरुण घाटगे या विमानदलातील अधिका-याबरोबर लग्न करते. कारण तिला हवे ते गुण अरुणमध्ये पहिल्याच भेटीत दिसतात. अगदी साध्या पध्दतीने त्यांचे रजिस्टर मॅरेज होते. अरुणची रजा संपते तिला तिचा कोर्स पूर्ण करायचा असतो. लग्नानंतर ती दोघं फक्त सहाच दिवस एकत्र राहतात. त्या सहा दिवसात त्याने तिला दिलेले सुख सहा वर्षे पूरेल एवढे आहे.

अरूण देशाभिमानी आहे. देशाविषयीच्या गोष्टींना त्याच्या मनात प्रथमस्थान आहे. त्यामुळे सरदार घराण्यातील असूनही डामडौल ऐषआराम यांना त्याच्याकडे थारा नाही. घरच्या माणसांशी तत्वत: त्याचे पटत नाही. म्हणून पहिल्याच भेटीत तो ललिताला खणखणीतपणे म्हणतो मला तुम्ही आवडलात " आपण दोघंही स्वतंत्र वृत्तीचे आहोत. तेंव्हा एकमेकांच्या स्वतंत्र विचारांना जपून भांडण तंटे न करता जास्तीत जास्त सहकार्याने , जे आयुष्य वाटयाला येईल. ते सुखासमाधानाने काढावं असे मला वाटते. "[२५] ( वेगळी – वेगळी – पृ. १३८ ) कारण त्याचे आयुष्य म्हणजे आळवावरचं पाणी आहे. आज आहे, उदया नाही.

अचूक बाँबफेक करून शत्रूच्या पाच विमानांचा नाश करून येत असतांना अरूणच्या विमानाचा अपघात होतो. त्याची हाय खावून ललिताचे वडील जातात. पण निधडया छातीची ललिता खचत नाही. दु:ख करणें म्हणजे अरूणच्या परंपरेला लांच्छनास्पद आहे असे म्हणून सर्वांचे सांत्वन करते. अरूण आपल्या उदरी त्याचा अंश ठेवून गेलाय या नव्या आशेवर जगतेय. त्या पराक्रमी वीर पुरूषाला सहा दिवस का असेना = त्याची सहचारिणी, पत्नी म्हणून आनंदाचे क्षण दिले यातच आपल्या आयुष्याचे सार्थक मानते. मुलगा मुलगी कांहीही होवो. त्याला प्रति अरूण बनवायचा चंग बांधते ' वेगळी ' शीर्षकाला साजेसी अशीच स्त्री व तिचा स्वभाव वसुधा पाटील रेखाटतात.

नियतीच्या क्रूर विळख्यात ललिता पुन्हा अडकते. व तिच्या पोटचा गोळा दिवस कमी भरल्याने मृतच जन्मतो. ललिताची खान्यापिन्यावरची वासना उडते. पाकळ्या मिटवून निर्माल्याच्या अवस्थेत जमिनीवर झोकून देणा–या फुलासारखी ललिताची अवस्था झाली होती. अरूणच्या बच्चाला पाहिलं देखील नाही याचं दु:ख तिला होतं. कॉलेजच्या टारगट . पोरांना ठणकावणारी वक्तृत्व स्पर्धेत आपले जगावेगळे विचार मांडणारी,ललिता गरीब चिमणीसारखी तिची अवस्था झाली होती. आपल्या सुनेच्या सुखासाठी खानदानी घराण्याचा अभिमान असणारे सरदार विठोजीराव घाटगे जुने

रितीरिवाज मोडून पूर्व परंपरेला छेद देऊन कुण्याही चांगल्या मुलाबरोबर तिचे लग्न करून द्यायला तयार आहेत. 'मी' स्वत:च्या मावस भावा-विषयी लिहिते पण तिला एवढयात लग्नाच्या फंदात पडायचे नाही. ज्या वेळेस लग्न करावेसे वाटेल. त्यावेळी मात्र पुन्हा ती शिपाईगडीच शोधणार आहे. पुन्हा एकदा सोल्जरच्याच मुलाला जन्म देणार आहे. अशी तिची जगावेगळी जिदद आहे. यानंतर दोन वर्षानंतर अरूणच्या तिसऱ्या पुण्यतिथीच्याच दिवशी सर्व वर्तमानपत्रात पुन्हा जाहिरात येते -
" सैनिकांविषयी आत्यंतिक आदर असणाऱ्या एका तरूण देखण्या , बुध्दिमान, सुशिक्षित अशा सैनिकाच्याच विधवेला सैनिकाशीच विवाह करण्याची इच्छा आहे. सेनादलाच्या कुठल्याही शाखेतील तरूण चालेल . जात, धर्म याविषयी कोणतीही अट नाही. " [२६] ( वेगळी - वेगळी - पृ. १५० ) कृपया पत्रव्यवहार करावा. खाली ललिता घाटगे अशी सही व घाटग्यांच्या वाडयाचा पत्ता होता.

स्त्रीच्या व्यक्तित्वात असणारे विविध पैलू ' टेकडया ! डोंगरा - एवढया ' ..... या कथेतून वसुधाबाई व्यक्त करतात. एकीकडे नियतीशी असणारे नाते आणि दुसरीकडे जीवन व्यवस्थेशी असणारे संबंध आणि त्यातून माणसांची व्यक्त होणारी शोकांतिका हे सारे समर्थपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य वसुधा पाटील यांच्या निवेदन शैलीत आहे.

विष्णुपंत हा जमदाग्नीसारखा रागीट समाजसेवक त्याचे अंतरीक दर्शन या कथेतून घडते. काशीताई, अनुताई या थोर समाजसेवकाने भोगलेल्या अभागी स्त्रिया आहेत. एकीला मूल होत नाही म्हणून दूसरीला हुंडयासाठी हा दांभिक समाजसेवक लाथाडते. आणि तिसरी या दोघींना न्याय देण्याचा विचार मांडते. म्हणून तिला मारहाण करतो. मातृत्वाच्या आशेने पहिल्या दोघी सारे सहन करतात. त्यावेळी त्यांचा झालेला मानसिक, शारिरीक छळ आणि पुरूषीपणाचा आव आणून स्त्रियांचा मनसोक्त उपभोग घेणाऱ्या एका

नराधमाचे चित्रण या कथेतून व्यक्त होते. वसुधा पाटील यांनी हुंडा पध्दतीचाही प्रश्न येथे उभा केला आहे. हुंडयासाठी तिला नवऱ्याने टाकले जाते. विव्दान, थोर समाजसेवक, स्त्री शिक्षण विषयक चळवळी करणारा, अनाथ आश्रम चालविणारा असा विष्णूपंतचा उल्लेख केला आहे. हे त्याचे बाहयरूप आहे. पण त्याच्या अंतरंगात प्रवेश केल्यास तो समाज-सेवकाच्या नावाने एक कलंक आहे.

स्त्री वैभवाचे लेणं एकदा लग्नात परिधान केल्यावर ती पतीसमवेत असो वा नसो जपते. हिंदू स्त्रीचे दर्शन घडते. काशीताई व अनुताई नवऱ्याने टाकलेल्या समदु:खी स्त्रिया आहेत. दोघी एकमेकांना आधार देतात. पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषाने पत्नीला मुले झाली नाहीत म्हणून दुसरे लग्न केले तर समाजाला ते मान्य होतं. अशाच एका काशीच्या नवऱ्याने दुसरी पत्नी केली. तिला मुले झाली तिचा संसार सोन्याचा झाला. पण हिच्या नशिबी धड सौभाग्यही नाही आणि धड वैधव्यही नाही अशी ही काशी नवऱ्याच्या दुसऱ्या पत्नीविषयी म्हणते, "दु:स्वास असा नाही. तिचं वाईट कशाला चिंतू मी उगीच ? पाप आहे ते, पण थोडासा हेवा मात्र वाटतो. असा रूपवान, राजबिंडा पुरुष नशिबानं मला मिळूनही हातून निसटला आणि तिच्या वाटयाला गेला. मला मूल झालं नाही .... बारा वर्षात एकही नाही ... तिला मात्र चांगल्या दोन मुली झाल्या.... शिवाय अगदी सुंदर .... "[२७] (टेकडया ! डोंगराएवढया-वेगळी पृ. १११) यातही तिला समाधान आहे. दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होता येते पण दुसऱ्याच्या सुखात सहभागी होणं अवघड पण इथे दुसऱ्याच्या सुखात सुख शोधणारी काशी वसुधा पाटील यांनी रेखाटली आहे.

या समाजसेवकाने पहिलीला मूल नाही म्हणून तर दुसरीला तीन महिन्याची गरोदर असतांना हुंडयासाठी जिन्यावरून ढकलून दिलेले असते हा समाजसेवक नसून नतद्राष्टा आहे. पुढचा जन्म आपल्याला पुरुषचा मिळेल पण आपण कुणाला छळायचं नाही असे अनुताई म्हणते. काशीताईच्या मनाला नवऱ्याबरोबरच खोटे नाते तोडून टाकतांना अजूनही क्लेष होतात. त्या

देखण्या बलदंड शरीरावर अजूनही जीव जडला होता. बारा वर्षात एकही दिवस अथवा रात्र शरीराला यातना दिल्याशिवाय गेली नव्हती. "वांझ म्हणून ज्या हातानी मारायचं, झोडायचं त्याच हातांनी निर्दयपणानं ते शरीर खस्सकन् जवळ ओढायचं आणि मन:पूत भोगायचं शृंगाराच्या नाजूक, कोमल प्रणय भावना, फुलवण, काहीही नसायचं.... नुसत्या पाशवी प्रमन्त वासना,... समोर असलेल्या नग्न देहाचा हिंस्त्रतेनं कुस्करून कुस्करून नुसता जबरी घास घ्यायचा"[२८] (टे॥ डोंगरा-एवढया -वेगळी पृ. ११४) हे सार प्रेमापोटी हवंहवसं वाटायचं. नवी आशा पालवायची. देह कणांकणानं फुलवून निघल, प्रसव वेदना भोगायला मिळतील. महिनाभर अशा आशा पालवित राहायचं नी महिना अखेरीस त्या वाळून कोळ व्हायच्या.

काशी, अनु, यांना खूप वर्षापूर्वी सोडून या समाजसेवकाने सरस्वती या तरुणीशी विवाह केला. पण सरस्वतीने या दोघींना न्याय देण्याचा विषय काढला तेंव्हा तिला चौरंग फेकून पाय मोडून जखमी केलं आणि वर्षभर सेवा करित बसला. तेंव्हा सरस्वती म्हणते 'आजारपणात.... गेल्या तीस वर्षात तेवढं एकच वर्ष सुखासमाधानाचं गेलं' ही सरस्वती नवऱ्याच्या मृत्युनंतर आपल्या सवतींना न्यायाचा वाटा देणारी एक अनोखी वेगळी अशी स्त्री आहे. पण त्या दोघी त्याचा स्विकार न करता अनाथ आश्रमाला द्यावे असे सांगणाऱ्या उदात्त अंत:करणाच्या पण शोषित-पिडीत दु:खी स्त्रिया आहेत. त्यांच्यावर लादलेले दु:ख हे पुरूष प्रधान समाज व्यवस्थेतून निर्माण झालेले आहे.

मुलगी पाहायला आणं आणि मुलगी दाखवणं हा तमाशा केंव्हा थांबणार ? याचा प्रत्यय 'शॉर्टकट' या कथेतून येतो. मान, स्वाभिमान, गुंडाळून ठेवून मुलींना चहाचा ट्रे घेऊन नवरदेवासमोर लाचारीने उभं रहाव लागतं ही खंत दीपासारख्याच समाजातील अनेक तरुणींची आहे. नव्या विचारांनी भारावलेल्या दीपाला मुलींना दाखवणे ही पध्दत पसंत नाही. दीपाच्या वडिलांच्या बदफैली पुरुषी वर्तनामुळे दीपाच्या आईला घटस्फोट घ्यावा लागतो. आईच्या घटस्फोटाचा प्रश्न मुलीच्या लग्नाच्या आड येतो. घटस्फोटात स्त्रीकडे समाजाची पाहण्याची दृष्टी संशयी आहे. हे त्याचे मुख्य कारण आहे. घटस्फोटामुळं दीपाची आई अगतिक बनली आहे. तर मुलीचे लग्न जुळून येत नाही. या विवंचनेनं असहाय्य झाली आहे. एका शोषीत स्त्रीचे चित्रण येथे जाणवते.

अनुप गोडबोले दीपाला पसंत करून जातो. त्याला दीपा खूप आवडते. दीपालाही तो पसंत पडलेला असतो. कुमार गंधर्वाचं 'अजुनी रूसूनी आहे' हे गीत म्हणून दाखविल्यावर व्याकूळ झाला होता. सुरेख गाणं म्हटल्याची कबूली दिली होती. दीपा पूर्णपणे अनुप मध्ये विलीन झाली होती. बाबांचं विचित्र वागणं, आईनं घटस्फोट घेणं, नोकरी करून एकटीनं जबाबदारी घेणं हे सारं संपेल अशा स्वप्नातंच ती जगत होती. पण एक दिवस अचानक अनुप गोडबोलेच्या मनात असूनही आई वडिलांच्यासाठी नकार येतो. दीपाला व तिच्या आईला धक्काच बसतो. घटस्फोटाचं खापर समाज स्त्रीच्याच माथ्यावर फोडतो. त्या पुरुष संस्कृतीचा दीपाच्या आईला क्रोध येतो, "या सगळ्या माणसांना पुरूषांचे दोष कधीच दिसत नाहीत का हो ? जे जे कांही वाईट घडेल त्याचं खापर आपलं बायकांच्या माथी मारून मोकळे सगळे." २९ (शॉर्टकट – वेगळी –पृ. २४) सारा समाज हा आंधळा आहे. त्याला कधी डोळे उघडून चांगले वाईट पाहताच येत नाही. माणुसकीच लोप पावली आहे. अशा पुरुषी संस्कृतीबद्दल दीपाची आई संताप व्यक्त करते.

दीपा आपल्या बापाच्याच वळणावर गेली आहे. पण नालायक व बेजबाबदार मात्र नाही. अनुप गोडबोले अचानक एक दिवस दीपाला भेटायला बोलावतो आणि त्याला चांगला खडसावून जबाब विचारण्याची संधी तिला मिळते. दीपा त्याला खूप आवडते. तिला नाकारणे त्याच्या शक्ती पलीकडेचे आहे. आणि आई वडील हृदयविकाराने आजारी असल्याने त्यांच्या म्हणण्यापलीकडे जाणेही त्याला अवघड वाटते. अशा द्विधा अवस्थेत त्याला आईवडीलही आणि दीपाही हवी आहे असे दीपाला तो बोलून दाखवितो. पण डोळ्यांनी पसंती दर्शवून खोटेपणा करण्यात शरम वाटली नाही का ? आईवडिलांना घाबरत असाल तर हातात बांगडया भरा असा परखड सवालही ती करते आणि त्याच्या आई–वडिलांना हवं असलेलं कुटुंब दीपाच्या घरी नाही त्यामुळे अनुपच्या आईवडिलांना म्हातारपणात फसवून लग्न करण्यात तिला स्वारस्य वाटत नाही. दीपा आजपर्यंत ताठ मानेनं, स्वाभिमानानं निष्कलंक जगली आहे. आपल्या क्षुल्लक फायदयासाठी डाग पाडणं व वृध्दांना फसवणं हे ती पाप मानते. कारण तिच्या अंगात हिंमत आहे. वाटेल

ते शार्टकट्स शोधत बसण्याची तिला सवय नाही. मगं थोडी दमछाक झाली. थोडा उशीर लागला तरी चालेल.

वसुधा पाटील यांच्या सामाजिक कथांचा परामर्श घेत असताना सामाजिक व्यवस्था आणि स्त्रीच्या व्यक्तित्वाच्या समस्या यातील संघर्षाचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यांची कथा अधिक समाजाभिमुख झालेली दिसते. त्यांनी स्त्री मुक्तीची स्वतंत्र कल्पना साकार केली असून सामाजिक संदर्भापलिकडे स्त्री-पुरुषासंबंधाचे मानसिक व अस्तित्वात्मक पातळीवरून केलेले चित्रण हे त्यांच्या सामाजिक कथांचे वेगळे वैशिष्टय आहे. समाजातील जातीधर्मांच्या भिंती त्या भिंतीच्या आत कोंडमारा होणाऱ्या व्यक्ती हुंड्यासाठी लाथाडलेल्या स्त्रिया, विधवा स्त्रीचे दु:ख, वांझ स्त्रीचे दु:ख, परित्यक्ता स्त्रीच्या समस्या अशा अनेक सामाजिक समस्यांचा स्पर्श या कथांना झालेला असून सामाजिक समस्यांची गुंतागुंत वसुधा पाटील यांनी आपल्या अनेक कथातून दाखवून दिले आहे. वसूधा पाटील यांची कथा स्त्रिच्या समस्येकडे तिच्या दु:खाकडे खूप मोकळेपणाने पाहते. स्त्रियांची अशी एक खास अनुभव संपदा वसुधा पाटील यांनी आपल्या कथेतून प्रभावीपणे व्यक्त केली आहे.

२. <u>कौटुंबिक कथा</u> :-

कुटुंब हा समाजव्यवस्थेचा आद्य घटक आहे. कुटुंब ही मानव समाजाच्या विकासातील पहिली अवस्था आहे. कुटुंबामुळे समाजाचे स्थैर्य व सातत्य टिकून राहते. विवाह संबंधातून कुटुंबाची निर्मिती होते. आज फक्त कुटुंबातच प्रेमाचे, ममतेचे, जिव्हाळ्याचे, आत्मियतेचे संबंध शिल्लक राहिले आहेत. आज संयुक्त कुटुंबाकडून विभक्त कुटुंब पध्दतीकडे कुटुंबसंस्थेची वाटचाल होत आहे. स्वतंत्र बिऱ्हाडं थाटली जात आहेत.

वसुधा पाटील यांनी आपल्या कथेतून मध्यमवर्गीय कुटुंबातील अनुभवावर भर दिलेला आहे. एकत्र कुटुंब पध्दतीचे फायदे व तोटे कुटुंबातील दारिद्र्य आणि दारिद्र्यात जगणारे कुटुंब यांचे दर्शन घडविले आहे. आई-वडील नसताना आलेले पोरकेपण, दोन स्त्रियामधील हेवेदावे, पती-पत्नीचे स्वभावदर्शन सारे करूनही शेवटी

कुटुंब प्रमुखाची होणारी हेळसांड, लग्न, मुले, पती, संसार यात होणारी स्त्रीची कुचंबणा याचे मार्मिक व हृदयस्पर्शी चित्रण वसुधा पाटील यांनी आपल्या कौटुंबिक कथेतून केले आहे. कौटुंबिक वातावरणाची व त्या संबंधातील धाग्यांची बैठक कथात असते. कौटुंबिक जीवनातील गुंता झालेल्या संबंधाचे ताण त्यांच्या कथेतून जाणवतात.

आठवणींच्या स्वरूपात व्यक्त होणारी "बि-हाड" ही कथा आहे. लेखिकेच्या श्रध्दाशील व भावनाशील दृष्टीकोनाशी या कथेतील विचार सुसंगत असल्याने हे लेखन अधिक लक्षणीय ठरले आहे. भावनेने भारावलेल्या जुन्या आठवणी, जुनी मूल्ये आणि जीवन यांचे चित्रदर्शी रेखाटन वसुधा पाटील करतात. वेचक सुंदर दिसेल ते पडेल त्या किंमतीला आणणारे, वाचनाचे व खाण्याचे भोक्ते असणारे आप्पा तरलवृत्तीचे सर्वस्वी विरोधी असूनही सारे सांभाळणारी काकू यांचे प्रसंगाप्रसंगातून लोभस दर्शन घडते.

एकत्र कुटुंबामुळे आजा-आजी, आई-वडील, काका-काकी, यामुळे मुलांच्यामध्ये एक खेळकरपणा निर्माण होतो. त्यांच्यावर चांगले संस्कार घडतात. शिवाय सुखदु:खाच्या प्रसंगी सर्वजण एकत्र येतात. या कथेतील मनूकाकी ही खेळकर स्वभावाची आहे. घरातील सारा कामधंदा सांभाळत सर्व मुलांना विनोद करून हसवत, खेळवत व खूष करत राहते. पण प्रसंगी ही काकी हट्टी बनते. "वेडयाचे तेल वांग्यावर" या प्रमाणेच मोठयांचा राग छोटयांवर मनू काकी काढते. तेंव्हा वडीलधारी आजी शहाणपणाचा विचार सांगताना म्हणते - " अग धाकटे, कशाला एवढा आक्रस्ताळेपण करतोस! मोठयांची भांडणं लहानांपर्यंत येऊ नयेत - गाढ झोपलीत अजाण पोरं, त्यांना अंथरूणांतून ओढून काढू नये असे - वाईट, ते - अभद्र लक्षण"[30] (बि-हाड - ज. के. तीर - पृ. १६३).

मला बरे वाटल्यावर ' तुझ्या माहेरच्या माणसांना बोलव ' असे श्यामच्या आईने म्हटल्यावर मनूकाकी स्वतंत्र बि-हाड करायचे ठरवते. काकीला घरकामातील फारसं जमत नसे म्हणून श्यामची आईच तिचं बि-हाड लावून देते. सर्वांची मुले खेळत आणि आजीकडे झोपत असतं. काकीच्या आनंदला श्यामच्या आईजवळ झोपण्याची सवय होती. आई आजारी असली तरी आप्पाच त्याला गोष्टी करत दूध पाजत.

पण वेगळया बिऱ्हाडामुळे आनंदा रात्रीचा चेकाळतो, मोठयानं रडू लागतो. मनू काकीला तिची चूक लक्षात येते त्याला दूध पाजण्यासाठी श्यामच्या आईना सांगते त्यावेळी वेगळे बिऱ्हाड केल्याबद्दल आप्पा तिला बोलतात तेंव्हा पश्चातापाने मनू काकी म्हणते " मला क्षमा करा भावोजी - तुम्ही आणि बाईंनी दोघांनीही क्षमा करा - पुन्हा मी असं करणार नाही - पण याला घ्या - तुमच्याशिवा हा राहायचा नाही - तुम्ही सांगाल ते कबूल आहे मला "[३१] (बिऱ्हाड - ज. के. तीर - पृ. १६६) वेगळे घर केल्याने मुलांची हेळसांड कशी होते हे या कथेतून स्पष्ट होते. एकत्र कुटुंब पध्दतीमुळे कसे फायदे होते. हे या कथेतून वसुधा पाटलांना जाणवून द्यावयाचे आहे.

आजोबा आजी, आई-बाबा व मुलं यांच्यात खेळीमेळीचं वातावरण असलेली कथा म्हणजे 'एका शनिवारची गोष्ट' ही होय. 'म्हणी म्हणजे अनुभवाच्या खाणी' या प्रमाणें या कथेत एका कुटुंबातील आई-वडिल सतत म्हणींचा वापर करतात त्यामुळे या कथेला एक प्रकारचे हलके फुलकेपण प्राप्त झाले आहे. म्हणून शेवटी भावनाशील असूनही ही कथा इतर कथाहून वेगळी वाटते.

कथेतील आई म्हणीशिवाय बोलत नाही. त्याचा परिणाम म्हणून त्यांचा मुलगा अवि व त्याच्या बाबांच्यावर हा परिणाम होतो. घरात खेळीमेळीचे वातावरण आहे, बोलतांना म्हणींचा सतत वापर करून सर्वजण हसून खेळून वावरतात. आई-वडिल यांच्यातील रूसवे, फुगवे यांचे चित्रण वसुधा पाटील यांनी या कथेत केले आहे. अनेक म्हणी हे या कथेचे विशेष होय. उदा:-' रोज मरे त्याला कोण रडे' 'खाण - तशी माती' 'नळी फुंकली सोनारे, नि इकडून तिकडे गेले वारे ', 'नाव सोनुबाई नि हाती कथलाचे वाळे', ' गाढवाला गुळाची चव काय', ' अग अग म्हशी मला कुठे नेशी ', ' अडला हरी नि गाढवाचे पाय धरी ', ' जेनुं काम तेनुं ठाय बीजा करे सो गोता खाय', ' रिकामा न्हावी नि भिंतीला तुंबडया लावी ', ' हातच्या काकणाला आरसा कशाला ', ' साठी बुध्दी नाठी ', 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' इत्यादी म्हणी वापरून म्हणींचा एक चित्रपटच डोळयासमोर उभा केला आहे.

अविच्या बाबांना सतत थट्टामस्करी करायची सवय आहे. त्यामुळे अविच्या आईची ते सतत चेष्टा, मस्करी करतात, अविच्या बाबांची वेड पांघरूण पेडगावला जायची सवय आहे. शेवटी चिड चिड चिडवायचं आणि अति तिथे माती व्हायची वेळ आली की वारा वाहेल तशी पाठ फिरवून सारं निट सावरून घ्यायचं हे सारं ते हसत हसतच करत असत. यातून कुणाची सुटका होत नसे, आजोबा आजींचीही थट्टा ते करीत असत. त्याच्या बाबांना रोज नवी चेष्टा, नवी मस्करी सूचत असे आई हे त्यांचे कायमच गि-हाईक.

नकर्त्याचा वार शनिवार त्या शनिवारीच म्हाता-या आईला पाहायला गेलेली अंजूची आई व म्हातारी दोघीही देवाघरी जातात. आणि अंजू आईविना पोरखी होते. अंजू मोठी होईपर्यंत अविची आई तिला सांभाळण्याचे व मोठे करण्याचे ठरवते. त्या पोरक्या पोरीविषयी तिला आपुलकी वाटते. त्यावेळी तिचे मन भरून येते. आणि म्हणते "काय झालं हो हे पोरीचं ? इतक्या लहानपणी लोकांच्या घरी राहायचं! परमेश्वरा...... माझ्या पोरांवर अशी वेळ नको रे येऊ देऊस बाबा. एकदाची मोठी झाली की मला खुशाल ने पण - हे असं, या पोरीसारखं पोरकं नको रे करूस त्यांना ..... "[३२](एका शनिवारची गोष्ट - ज.के.तीर - पृ.२९) आईने पोरक्या अंजूला आश्रय दिला. आणि तेंव्हाच अविनेही मनाला ठरविले की, बिचा-या अंजूशी लग्न करायचं, तिला फसवायचं नाही, तिच्यावर रागवायचं नाही. अगदी बाबांसारखंच वागायचं, अनाथाला आधार द्यायचा.

बालपणातील जीवनाचा एक मुक्त पट 'आम्ही तिघे' या कथेतून उलघडतो. वसुधा पाटील यांचे काही अनुभव वास्तव जीवनाशी निगडीत आहेत आणि नकळतपणे त्यावर त्या प्रकाशझोत टाकतात. बालपणातील 'मी' राघव बाळू यांचं विश्वमात्र निराळं होतं. बालपणाचा तो एकसंध, चित्रविचित्र स्वप्नांनी मोहरलेला, बालिश कृत्यांनी लडबडलेला, विलक्षण धुंदीचा तो काळ या तिघांचाच होता. पण ती तिघं आता वयाने खूप वाढली आहेत. प्रत्येकाचा स्वभाव, व्यवसाय आणि वाट निराळी झाली आहे. पण सुगंधाच्या लाटांनी कालगणना करणारं त्यांचं बालपण आहे.

बालपणातील बालमनाचे दर्शन वसुधा पाटील यांनी अत्यंत हळुवारपणे या कथेत उलगडून दाखविले आहेत. असे जरी असले तरी ही कथा काही ठिकाणी पाल्हाळीक वाटते. या तिघांचे बालपणातील सारे खेळ आंब्याचे दिवस येत त्यावेळी उडालेली धांदल आहे. गुळातुपाची चोरी आणि वाटी-वाटी मुरांब्याच्या फोडीबद्दल मार मिळाला आहे. दुधावरील पिवळी धमक घट्ट खापरीसारखी साय खातांना सिताफळीच्या शिपटीने बसलेला मार आहे. मे महिन्यात आंब्याची चोरी जुलैमध्ये उघडकीला आली की गालातल्या गालात हसत आई म्हणे, "कार्ट्यांना तिन्ही त्रिकाळ खायला दिलं तरी भुका शमत नाहीत. यांच्या कशी आडदांड होत चालली आहेत पाहा... या भुकेपोटी मलाच एकदा या मेल्यांनी गिळून टाकलं नाही म्हणजे मिळवली"[33] (आम्ही तिघं'- ज. के. तीर - पृ. १४५ )

पहिल्या पावसात अंगातले सारे कपडे फेकून देऊन नागड्याने नाचणारे बाळू, राघव बेफाम होऊन खिदळत असत. आईच्या माराची त्यांना भीती नसे. खूप पाऊस पडला की शाळेला सुट्टी मिळे आणि घरात चंगळ होत असे. मातीचे बैल आणि बाहुल्या करण्यांत ते तल्लीन होत असत.

लहानपणीच्या सा-या आठवणी या तिघांनी जशाच्या तशा जोपासलेल्या आहेत. ते प्रसंग जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे राहावेत इतके जिवंत वाटतात. बाळूच्या पाचव्या वाढदिवसाला आत्याबाईने दिलेली लाकडी रंगीत ठोकळ्यांची भेट आणि त्याबरोबर सहा युरोपियन देशातली निसर्गचित्र यांच्या स्मृति आजही जिवापाड जपलेल्या आहेत. कारण असे दिवस पुन्हा कधी न येणारे आणि त्यांच्या मुलाबाळां- नाही अनुभवायला न मिळणारे आहेत.

कधी कधी मृत्युसारख्या घटना कुटुंबामध्ये घडतात आणि संपूर्ण कुटुंब जीवन विस्कळीत होते. गेलेल्या माणसांच्या आठवणी मनाला व्याकूळ करतात व जीवन असहाय्य होते. 'माझे आई-वडील' ही कथा हेच व्यक्त करते. 'माझे आई-वडील' या कथेमध्ये भाऊ आणि काकू यांचे स्वभाव दर्शन घडते. वास्तविक दोघेही स्वभावाने कडकच होती, भाऊ हे रसिक होते. मुलांना व्हिक्टोरियातून समुद्रात फिरवून आणत असत. पाव्हण्या-रावळ्यांची दोघांनाही आवड होती. त्यांच्यासाठी पैसा खर्च करण्याची भाऊंना आणि कष्ट घेण्याची काकूला भलतीच हास होती.

बहुत: भाऊ आणि काकू हे जोडपे बिजोड होतं. काकू सुंदर तर भाऊ कुरूप; काकू अबोल तर भाऊ मुलखाचे बडबडे वास्तविक दोघंही स्वभावाने कडकच भाऊ कट्टर शाकाहारी आणि काकी पक्की मांसाहारी, पण याबाबत कधी विरोध निर्माण झाला नाही. अशा दोघांच्या परस्पर विरोधी कित्येक गोष्टी या कथेत दिसून येतात. काकीही भाऊंची दुसरेपणाची पत्नी होय.

रसिक आणि शिक्षक भाऊनी आपली पहिली पत्नी वारल्यावर तिची मुले असतांना दुसरे लग्न केले या पहिल्या पत्नीच्या मुलांच्या काकू या घरी आल्या. त्यांनी या घरासाठी खूप केले. भाऊंची पहिल्या पत्नीची मुलगी भरल्या संसारातून जेंव्हा अचानक अपघाताने उठून गेली. त्यावेळी स्वत:ची मुलगी गेल्याप्रमाणें काकू रडली, दु:खाने पोळली. भाऊ आणि काकूच्या मृत्यूने परत एकदा ही मुले पोरकी झाली. पुन्हा खूप दिवसांनी बालपणी वावरलेले घर 'मी' पाहते. तेंव्हा तिला या गतस्मृती आठवतात. आणि तिच्या वयाच्या मुली जेंव्हा "माझे आई-वडील असं म्हणतात, असं करतात, परवाच आमच्याकडे येऊन गेले किंवा आम्ही त्यांच्याकडे जाऊन आलो."[३४] ('माझे आई-वडील' - ज. के. तीर -पृ. १३८) असे मोठया कौतुकाने प्रेमाने सांगतात. त्यावेळी 'मी' ला फार उत्कटतेने जाणवते की माझे आई-वडील म्हणजे माझे भाऊ आणि काकू असायला हवे होते. आमची कर्तबगारी पहायला ते नाहीत याची खंतही या कथेतून व्यक्त होते. पोरक्या मुलांना आपल्या हक्काचं असं कोणीतरी असावं असे या कथेतून वाटत राहते. आणि म्हणूनच आज काकू आणि भाऊ आहेतही आणि नाहीतही असे वाटत राहाते. कौटुंबिक जीवनातील कथांचा तपशील वसुधा पाटील अतिशय तरलपणे व्यक्त करतात.

लग्न झालेल्या स्त्रीची कांही कोमल, हळुवार स्वप्न असतात, पण रानटी, हिंस्त्र असणारा नवरा पहिल्याच रात्री रानदांडगेपणानं तिच्या देहाचा कुस्करा करून टाकतो. याचा प्रत्यय 'आनंदवन' या कथेतून व्यक्त होतो. या कथेतील आनंदीचे 'आनंदवन' म्हणजे नवरात्रीची लाज शरम, विनय, आनंद, उत्सुकता, अधिरता होय. पण वंश परंपरेने चालत आलेल्या राक्षसी वृत्तीचा आनंदीचा नवरा तिचे आनंदवन उध्वस्त करतो.

वसुधाबाईंच्या कथातील स्त्रिया अतिशय मनस्वी आहेत. माझे भोग मलाच भोगले पाहिजेत असे म्हणणारी दुर्दैवी आनंदी येथे भेटते. स्त्री ही वस्तू किंवा यंत्र नाही तर तिलाही मन असते. तिच्याही भावना असतात, तिची कांही स्वप्ने, इच्छा, आकांक्षा असतात. याचे चित्रण या कथेत येते. बायको म्हणजे फौजदारच्या लेकी. चौकीवरचे गुन्हेगार म्हणून आनंदी माहेरी गेल्यावर पुन्हा त्या राक्षसी रानटी फौजदाराकडे जायला कुरकुर करते. अखेर निर्ढावल्यासारखी होऊन यंत्रासारखं ती आपलं शरीर त्याच्या स्वाधीन करू लागली. कळसूत्री बाहुलीप्रमाणें त्याच्या खोलीत जाई आणि निर्जीवपणे त्याच्या स्वाधीन होई.

सैतानी वृत्तीचा हा फौजदार हॉस्पिटमध्ये जाऊन आपल्या मुलालाही पाहत नाही. घरी आणलेला मुलगा पाहून संतापतो व सारा दोष बायकोलाच लावतो. राक्षसासारखा दिसणारा मुलगा माझा नाही. तो मारून टाक ... कारण कांता बोरगावकरणीला त्यांच्यापासून झालेला मुलगा फाकडू दिसतोय आणि गल्ली समोरच्या शेठणीला मुलगी झालीय तीही याचीच आहे. आणि त्यामुळे हे घाणेरडं जनावर आपले नाही असे स्पष्टच सांगतो. आपल्या पोलीसी खात्याचा दम दाखवून भिकारीण, कचरा गोळा करणारी भंगीण यांचा उपभोग घेतो असा हा हिंस्त्र फौजदार. स्त्री म्हणजे केवळ भोगवादी वस्तू आहे. असे समजणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीचे दर्शन घडते.

आनंदी आणि विश्वास यांचे प्रेम असते. आनंदी त्याला आवडत असते. पत्रातून आनंदीला लग्नासाठी त्याने होकार मागितला होता "जर या बाईसाहेबांनी होकार दिला तर एक छोटसं सुंदर घर हिच्यासाठी बांधायचं. भोवती बगीचा करायचा. एकझोपाळाही तिथे बांधायला हवाच. आणि मग मी त्या घराला नांव देईन - आनंदवन ..... आनंदवन"[३५] (आनंदवन - वेगळी - पृ. ९०) पण जातीपातीचे कारण सांगून विश्वासला आनंदीच्या वडिलांनी नकार देऊन तिचा घात केला होता. केवळ जातीपातीचा विचार केल्याने एका कोमल फुलासारख्या मुलीच्या जीवनात वाळवंट पसरवणाऱ्या ह्या कुटुंबातील बापाचे दर्शन घडविले आहे आणि याच बापाने स्वत:च्या मुलीला राक्षसाच्या हाती देऊन अशा आनंदवनापासून दूर ठेवले हेच तिचे दुर्भाग्य होय.

स्त्रीला आजही जुन्या रुढी परंपरा यांचे पालन करावे लागते. त्यामुळे आनंदीला इच्छित तरुणाबरोबर लग्न करता येत नाही. मानवी वासनेला बळी गेलेली ही स्त्री बाप, पती, मुलगा यांच्या वर्चस्वाखाली दबून जाते. लग्न, संसार नियम, परंपरा यांची बंधने फक्त स्त्रियांवरच आहेत. पुरुष मात्र त्यातून मोकळा असतो. आनंदीवर इतकी संकटे आल्यावर तिचा भाऊ तिला घटस्फोट घ्यायचा सल्ला देतो. पण ती म्हणते, 'माझे भोग मलाच भोगले पाहिजेत.' म्हणून ती सहन करत राहते. पण तिच वेळ तिच्या नवऱ्यावर आल्यावर तो सोडचिठ्ठी द्यायचा निर्णय झटकण घेतो.

कुटुंबातील नाती, संबंध जिव्हाळ्याचे असतात. पण कांही वेळा स्वार्थासाठी, व्यवहाराची ही सारी नाती तोडली जातात. त्यामुळे त्या कुटुंबावर अवदासीनतेची छाया पसरली जाते. 'अकाली मोहोर' या कथेतील कुटुंब याला अपवाद नाही. या कथेतील आई नियतीशी झुंज देते आहे. आणि या झुंजीत तिचा ज्या तऱ्हेने संताप व्यक्त होतो, ते तिचे चित्र डोळ्यापुढून हालत नाही. मात्र ही कथा विनाकारण पसरली असून पाल्हाळीक वाटत राहते.

या कथेतील आप्पा हे कुटुंब प्रमुख असून कुटुंबासाठी सर्व खस्ता खातात. तीन भावांचे शिक्षण करतात. सर्वांना लहानाचे मोठे करतात. प्रसंगी बायकोच्या हातातील गोठ विकून भावांची कॉलेजची फी भरतात. पै-पैसा जमवून वडीलांच्या इच्छेखातर घर उभं करतात. पण आप्पा आता मुकेपांगळे होऊन पडले आहेत. एकत्र कुटुंबात न मिळविणाऱ्याचे कुत्रे सुध्दा हाल खात नाही हा अनुभव येतो. या कुटुंबातील सर्वांची नाती जवळची असूनही बाप मेल्याचे दु:ख रघूच्या कांकाना होत नाही. किंवा भावाच्या आजारपणाचे त्यांना कांही वाटत नाही. अशा निर्दयी व व्यवहारी माणसांचे दर्शनही घडते. एकमेकांच्या आपुलकीपेक्षा व्यवहाराला महत्त्व दिले जाते. शेवटी सर्वांना सांभाळणाऱ्या आप्पांना उपेक्षित जीवन जगावे लागते.

नोकरी करणाऱ्या वामन काकाला वेळेचे महत्त्व वाटते म्हणून वडील जाऊन तीन तास व्हायच्या आत ते तिघे भाऊ घराची वाटणी करून त्याच रात्री सर्व खोल्यांना मोठी कुलपे लावून अपंग आप्पांना गोठ्यातल्या मोडक्या बैलगाडीत

टाकतात. कुटुंब प्रमुखालाच घराबाहेर फेकण्याचा अघोरी डाव साधतात. त्यावेळी हे घराचे वासे मोजणारे कर्मदरिद्री वाटतात! त्यावेळी रघूची आई विव्हळ होते आणि आपल्याच दिरांनी आपल्या पतीला असं बेवारश्यासारखं टाकावं हे तिला सहन होत नाही. शेवटी ती आपला संसार गोठ्यातच थाटते. आणि पुन्हा नवा संसार खंबीर वृत्तीने उभा करते.

आप्पाना गोठ्यात टाकलेले पाहून आई धाय मोकलून रडते रघू घराच्या सर्व काचा दगडाने फोडायला उठतो. विटा टासळायला तयार होतो. पण आई त्याचा हात घट्ट धरून म्हणते " माझ्या सोन्या तुझ्या आप्पांनी मोठ्या हौसेने हे घर बांधलंय सगळं सगळं घालवून बसले ते या घरापाशी ..... आणि तू त्या दगड मारून फोडून काढणार ? अरे वा रे वा! मी नाही तुला असा आघोरीपणा करू द्यायची ... "[३६] ( अकाली मोहोरं - वेगळीपृ. ५३ ) कारण ते घर त्यांचच आहे. एकना एक दिवस ते आपल्याला मिळणार अशी तिला आशा आहे. नवऱ्याने बांधलेल्या घरावर तीचं अतिव प्रेम आहे. आपले नसलं तरी आपल्या कष्टाने उभे केलेल्या घराबद्दल तिला आपुलकी आहे. त्या घरामध्ये नवऱ्याच्या कष्टाच्या घामाचा गंध दरवळतो आहे. म्हणून आई रघूला सांगते. माझ्या अंगात धमक आहे. तुम्हा सर्वांना मी वाढवीन तेंव्हा घराची एक काच किंवा कौल तर याद राख अशी धमकीही देते. आहे त्या परिस्थितीत जगण्याची सहनशीलता या स्त्रीत आहे.

पेंडसे वकील निस्वार्थी भावनेने एक उपेक्षित कुटुंब म्हणून रघूच्या आईला घरकाम केल्याबद्दल वेळोवेळी मदत करतात. पण लोक घाणेकडे बोलतात. वामन काकाही सर्वांना सांगत सुटतो. रघूला हे सहन होत नाही म्हणून आईने त्यांच्याकडे जाऊ नये असे त्याला वाटते. पण आईच्या सोशिक मनाला तडा जातो "आता वामन्याला परत कुणाशी असं बोलतांना ऐकलंस ना, की तू पुढे येऊन त्या लोकांना मोठ्यांदा सांग, माझ्या आईला वेसवा या वामन काकांनीच केली. माझे बाबा नपुंसक आहेत. मी, दादा या वामन काकांचीच, दिसतो की नाही आम्ही वामन काकांसारखेच ?"[३७] ('अकाली मोहोर' - वेगळी - पृ. ५८) आईचे हे उद्गार वाचकाच्या मनाला जाऊन भिडतात आणि वास्तव विदारक स्थितीचे दर्शन घडते. दारिद्र्यामुळे रक्ताची नाती तुटायची वेळ निर्माण होते.

गरीबीतही प्रामाणिकपणे जगणारी रघुची आई पेंडसे वकीलांच्या मार्फत घराची केस लढविते. बरीच वर्षे रेंगाळलेले काम त्यांचा मुलगा दत्तू लढवितो. रघू नोकरीनिमित्त बाहेर जातो. अंगणातल्या आंब्यांना अकाली म्हणजे पावसाळ्यात मोहोर येतो, आंबे लागतात. केसचा निकाल लागतो. घर ताब्यात मिळते. रघूची आई व बहीण घरात स्वच्छता करून राहतात. पण अचानक एक दिवस घराला आग लागते आणि त्यातच रघूचे आप्पा, बहीण व मुलगा जळून मरतात. आई ओरडत बाहेर पडते. दैवगतीपुढे कुणाचे कांही चालत नाही. असा शोकांत शेवट होतो.

वसुधा पाटील यांच्या कौटुंबिक कथा पाहत असतांना त्यांच्या कथेतील- कुटुंबासाठी सर्व खस्ता खाणारा आहे. कुटुंबातील स्त्रिया सोशीक आहेत. गरीबीतही दुसऱ्याला प्रामाणिकपणाची व दुसऱ्याला मदत करण्याची भावना आहे. सवतीच्या मुलींनाही मुलाप्रमाणे प्रेम देणाऱ्या उदात्त स्त्रीचा प्रत्यय वसुधा पाटील यांच्या कुटुंब कथेतून येतो. पती-पत्नी यांच्यातील रूसवे फुगवे यांचे कौटुंबिक जीवनातील चित्रण वसुधा पाटील यांनी अत्यंत सहजपणे व घरगुती वातावरणातून हळुवारपणे साकार केले आहे. कांही वेळा व्यवहारी व स्वार्थीवृत्तीमुळे उध्वस्त कुटुंबाचे शोकांत वर्णनही येते. कुटुंबात अनेक प्रकारे जाळणाऱ्या दु:खाच्या कळा वसुधा पाटील आपल्या कौटुंबिक कथेतून व्यक्त करतात.

३) <u>प्रेमकथा</u> :

स्वत:ला विसरल्याशिवाय प्रीतीचं दान करता येत नाही, स्वत:ला विसरल्याशिवाय प्रीतीचं दान घेता येत नाही ही प्रीतीची कल्पना त्यांच्या कथेतून येते. प्रेम म्हणजे दुसऱ्याच्या सुखदु:खात समरस होणे व स्वत:ला विसरून दुसऱ्याला देता येईल तेवढे देणे, याचा प्रत्यय वसुधा पाटील यांच्या प्रेमकथातून येतो. सामान्य स्त्री-पुरूषांना एकमेकाबद्दल तरूण वयात वाटणारे आकर्षण त्यामुळे त्यांचे जीवन सुंदर व अर्थपूर्ण होते. प्रेमात दान देणे किती सर्वश्रेष्ठ आहे. अशासारख्या अनेक अनुभवाशी वसुधा पाटील यांची प्रेमकथा नाते सांगणारी आहे.

प्रेमात सौंदर्यापेक्षा वृत्तीला महत्व असते. काही स्त्रिया हट्वादी असतात. त्यामुळे आयुष्यात त्यांचे कुणाबरोबर पटत नाही. प्रेमभंगामुळे माणूस निराश होतो. याचा प्रत्यय 'प्रीतीचे दान' या कथेतून येतो.

तेवीस वर्षांच्या विश्वासबरोबर सदुसष्ट वर्षांच्या आजी वेरूळ कैलासची लेणी पहायला जातात. आजीच्या ठिकाणी असणारी अथांग अनुभवाची शिदोरी त्यामुळे विश्वासचे विफल प्रेम, अस्वस्थ विश्वासच्या सूक्ष्म आणि नाजूक हालचालीवर आजीचे लक्ष आहे. विश्वासच्या हटवादी प्रेयसीने दिलेला धोका. विश्वासचा प्रेमभंग त्यामुळे असहाय्य व नाराज झालेल्या विश्वासला आजी आपल्या अनुभवाच्या शिदोरीतील थोडे देताना म्हणते - "त्या प्रीतीच्या जोरावर मी माझी सारी हयात उमेदीत काढली. यांच्या मृत्यूनंतरही.! आणि पोरा त्या गर्विष्ठ पोरीने नकार दिला म्हणून तू असा हताश होऊन बसलाहेस मला पाहवत नाही हा तुझा हळवेपणा असं समज की, आपण केलेली प्रीती खरी नव्हतीच, यौवनातला उन्माद होता तो. खऱ्या प्रीतीची देवाण घेवाण अगदी नकळत होते. ती प्रीती माणसाला उमेद देते. बळ देते... ... हताश व्हायला शिकवत नाही. रडायला तर मुळीच देत नाही -"[३८] ('प्रीतीचे दान' ज.के. तीर - पृ. ३२) अशा उदात्त प्रीतीची ओळख प्रेमभंगाने खचलेल्या आपल्या नातवाला ती करून देते.

कैलास लेण्यातील मूर्तींमध्ये असणारी एकस्मता, एकमेकाला विसरण्याचे भान देते. स्वत:ला विसरून दुसऱ्याला देण्याची वृत्ती हवी. जसे मूर्तीतील जोडपी आहेत. प्रेम करतांना शिवपार्वती, विष्णू लक्ष्मी, रामसीता यांच्यासारखी भक्ती व अनुरागही असायला हवा. असाच संसारही असायला हवा. जो आपल्याला आवडतो तो आपला होत नाही. हा नियतीचा खेळ आहे. आजीचे गंगाधर बरोबर लेणी पाहणे आणि आजोबांचा लेणी पाहण्यात उत्साह नसणे तर गंगाधरची पत्नी रसिक नसणे व त्याच्याबरोबर न येणे ही जीवनातील विसंगती दु:खाला कारण ठरते. पण गंगाधर आणि आजी यांचे एकत्र येणं रसिक मन फक्त लांबूनच जाणणं प्रीतीची भावना फक्त मनातच ठेवणं ही लौकिकदृष्टया सफल प्रीती नव्हती. ती विफलच होती पण गंगाधर आणि आजीच्या दृष्टीने ती सफलच होती. ते प्रीतीचे दान होते.

बाहेरगावी गेल्याने पती-पत्नीमध्ये जो विरह निर्माण होतो. व विरहानंतर मिलनासाठी अधीर झालेल्या मनाचे दर्शन 'स्त्री' या कथेतून प्रत्ययाला येते.

पाच महिन्यांच्या विरहानंतर बाहेर गावी गेलेला विश्वनाथ हा इंदिरेचा पती;, तो परत येतो तेंव्हा आपली पत्नी इंदिरा हिला भेटण्यासाठी त्याचे मन पुलकित झालेले असते. इंदिराही त्याच्याशी समरस होण्यास उत्सुक असते. अशा अत्युत्कट विरहा नंतरच्या मिलनप्रसंगी त्याच दिवशी इंदिराची थोरली बहिण जिचा नवरा सतरा वर्षांपूर्वी वारला आहे ती आक्का आलेली असते. विश्वनाथ आणि इंदिरा यांचे प्रेम व मिलन पाहून तिच्याही भावना अनावर होतात.

पुरुषी सहवासाला आसुसलेली विधवा आक्का इंदिरा व विश्वनाथचे मिलन चोरून पाहतांना तिच्या संवेदना जागृत होतात व तिचा रोम रोम पुलकित होतो. व त्याचक्षणी आक्का बाहेर कोसळते. दोघेही बाहेर येऊन पाहतात. त्यावेळी आक्काने विश्वनाथच्या गळ्यात घातलेल्या हातांची सोडवणूक करतांना विश्वनाथ व इंदिराला खूप त्रास होतो. तेंव्हाच इंदिराच्या आक्काची ही पिडा शारीरिक विरहाची वेदना लक्षात येते व इंदिरा म्हणते. "माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हाला. हो म्हणा, हो म्हणा, फक्त माझ्यासाठी, फक्त माझ्यासाठी आणि हिच्यासाठी. किती वर्ष असं जिणं ही जगतेय!"[३९] ('स्त्री' ज. के. सीर- पृ. ११६) आपल्या पतीला आपल्या थोरल्या विधवा बहिणीकडे पाठविणारी ही स्त्री विलक्षणच आहे.

'स्त्री' या कथेतून स्त्रीचे स्त्रीच्या खऱ्या वेदना समजू शकते. हे इंदिरेच्या उदात्त वागण्यावरून दिसून येते. स्त्री ही प्रेमासाठी आसुसलेली असते. याची जाणीव इंदिरेला तिचा नवरा बाहेरगावी पाच महिने गेल्यावर आलेली असते. तो विरह तिने सहन केलेला असतो. सतरावर्षे विधवा असलेल्या आपल्या आक्काने हा सतरा वर्षांचा विरह कसा सहन केला असेल याची जाणीव एक स्त्री या नात्याने इंदिराच समजू शकली. स्त्री प्रेमाला आसुसलेली असते. तिला आपले म्हणणारे, जवळ घेणारे कोणीतरी असावे असे वाटत राहते. हे आक्का या विधवा या विधवा स्त्रीच्या व्यक्तिरेखेतून जाणवते.

माणसाचे मन चंचल असते. माणूस वेगवेगळे विचार आपल्या मनात घोळवत असतो आणि स्वप्नमय व भासमय जगात वावरतांना दिसतो. त्याच तंद्रीत

कल्पनातीत सुखाला थारा देऊन वास्तव सुख लांब करत असतो. तंद्री भंगली की पुन्हा वास्तव हे वास्तवच असल्याची जाणीव होते. याचा प्रत्यय 'पुरुष' या कथेतून येतो.

स्वत:ची पत्नी सुंदर, सुरेख असूनही परस्त्री विषयीचे येणारे सैरभैर विचारांचे चक्र प्रदीपच्या मनात फिरत आहेत. वैजयंती ही प्रदीपची पत्नी. वैजयंतीने प्रदीपला जिंकलं आहे. आपल्या प्रेमळ व संसाराला आवश्यक असणाऱ्या साऱ्या गुणांनी. वैजयंती ही प्रदीपची पत्नी असल्यामुळे त्याची ती स्वामिनी आहे. तिच्याशिवाय त्याच्या हृदयात कुणालाही प्रवेश नाही. पण प्रदीप म्हणतो त्याची प्रेयसी निर्मला व वैजयंती या दोघींना त्याच्या मनातील तडफडाट व आक्रोश कळत नाही. कारण त्याला 'सुगंधा' हवीय. कारण वैजयंतीचा फणकारा त्याला डंख मारतो आणि निर्मलेचा लाघटपणा त्याला तुला वाटतो. म्हणून सुगंधाशिवाय त्याला चैन पडत नाही. पण ही 'सुगंधा' सिगारेटचे झुरके मारत एकांतात पाहिलेली कल्पनातीत स्त्री आहे.

निर्मला, वैजयंती, सुगंधा या तिघींचा विचार करताना प्रदीपची विचल मनोवस्था दिसते. हातच सोडून पळत्याच्या मागे लागण्याच्या वृत्तीने बऱ्याचदा वावरतात. म्हणून प्रदीप वैजयंतीसारखी सुंदर पत्नी असताना वास्तवात नसणाऱ्या 'सुगधा' चा विचार करतो. शेवटी कल्पित हे वास्तव होणार नाही. म्हणून प्रदीप आपल्या पत्नीचा म्हणजेच वैजयंतीचाच तूर्त विचार करतांना आढळतो.

तारुण्यात पदार्पण केल्यावर माणसाला प्रेम मिळते. त्या प्रेमात तो बेहोष होतो. पण त्याचबरोबर एखादा तरुण व्यसनांच्या आहारी जातो. आणि त्यातून बाहेर पडणे त्याला असह्य होते. शेवटी त्याची प्रेमिकाही त्याला दूरावते याचे चित्रण ' कस्तुरबा ' या कथेतून वसुधा पाटील यांनी केले आहे.

' कस्तुरबा ' ही नायिका प्रधान कथा असून जीवनाविषयी काही निश्चित कल्पना उराशी बाळगून ' सरला ' ही या कथेची नायिका साकार होते. तिचा स्वभाव मनस्वी असून आपला जीवनसाथी कसा असावा याची

चोखंदळ दृष्टी तिच्यात आहे. सरला आणि श्रीकांत यांचे प्रेम आहे. सरला अनाथाश्रमात वाढली आहे. तिला तिच्या आईबापांचाही पत्ता नाही. पुढे शिकून ती नर्स बनते. तन्मयतेने सेवा करते. सामाजिक कार्य करते, सैनिकासाठी फंड जमा करते. पण श्रीकांत मात्र संगतीमुळे हळूहळू जुगार खेळायला लागतो. सरलाला हे आवडत नाही. म्हणून वेळोवेळी श्रीकांतला सुधरवण्याचा ती प्रयत्न करते. शेजारच्या अरविंदच्या कॉलेजची फी भरण्यासाठी श्रीकांतने जुगारात मिळविलेले पैसे ती नाकारते. श्रीकांतचा पैसा निढळ्या घामाचा नाही. श्रीकांतचे पैसे सैनिकांना दिले तर लढण्याऐवजी त्यांनाही व्यसने लागतील असे वाटते. कारण तिच्याही जीवनाविषयी निश्चित कांही कल्पना आहेत. तिचीही कांही मूल्ये आहेत. या मूल्यासाठीच प्रसंगी श्रीकांतचे प्रेमही झुगारण्याची तिची तयारी आहे.

सरलासाठी श्रीकांत अनेक मुलींचा मोह आवरतो, अनेक स्थळे सोडतो. मित्रांचा उपरोध पचवतो पण संगतीने व्यसनाधीन झालेला व जुगार खेळणारा श्रीकांत त्यातून बाहेर पडू शकत नाही. आणि जे सरलाला नको होतं ते श्रीकांतला हवं होते. पण सरलाला तो दचकून होता. श्रीकांत हा चांगल्या घराण्यातला आहे. म्हणून त्याला आपल्या प्रेमाने सरला, सुधरवण्याचा प्रयत्न करते. माणसानं माणसासारखं वागावं एवढचं तिचं सांगण आहे. अशा ह्या आढयते खोर-मिजाशी सरलाचा नाद सोडावा असे श्रीकांतला वाटत राहते आणि व्यसनाधीन श्रीकांत प्रेमात अयशस्वी होताना दिसतो.

स्त्री जीवनातील दु:खावर आजवर अनेक लेखक लेखिकांनी ललितसाहित्यातून आकार दिला असेल पण इथे साकार होणाऱ्या विलक्षण मनस्वी तरुणी अमूर्त मूल्यांसाठी केलेल्या संघर्षातून. मग नियोजीत वराने लग्न मोडले किंवा तो बदफैली निघाला तरी त्याच्याशीच लग्न करण्याचा निग्रह टिकवणारी व कधी तरी आपणच याची पत्नी आहोत हे त्याला पटेल अशी आशा बाळगणारी नायिका 'सुचेता' कथेतून सिध्द होते.

'सुचेता' ही भारतीय पारंपारिक पावित्र्याचे संस्कार जपणारी एक सालस अशी मुलगी आहे. अजित बरोबर लग्न ठरल्यानंतर ती त्याच्यावर मनापासून प्रेम करते. त्याच्या घरातील सर्व कामे आवडीने करते. अजितही तिच्यावर प्रेम करतो. असं तिला वाटत असते. पण एक दिवस अजित लग्नाला नकार देतो. तेव्हा त्याला ती म्हणते, "तुम्हाला लग्नाची गळ घालायला मी आले नाही. माझ्याबद्दल जोपर्यंत तुमच्या मनात प्रीतीभाव निर्माण झाला नव्हता तो पर्यंत तुम्ही मला स्पर्श करायला नको होता. मी हे तुम्हाला पहिल्यांदा सांगीतले नव्हते ? का चुंबन घेण्याची अपेक्षा बाळगलीत ? का मला या मोहात पाडलंत ? मी सर्वस्वी तुमची आहे. या भावनेने मी जे जे तुम्हाला दिले, त्याचा तुम्ही आनंदानं स्वीकार केलात आणि आता तुमच्या विषयी प्रीतीची गाढभावना मी मनात रुजवून बसले तर तुम्ही म्हणता आहात, 'माझं आणि तुझं जमणार नाही'. तुमची प्रीती खरी नव्हती - नुसतं प्रीतीचं सोंग उभारलत आणि माझ्या साऱ्या श्रध्देसकट माझा बळी घेतलात. आता या शरीराला पुन्हा कुणाला स्पर्श करायला देऊ मी ? कुठल्या भावनेनं माझं सर्वस्व अर्पण करु ?"[४०] ('सुचेता' - ज. के. तीर - पृ. ३९) आणि याप्रमाणेच ती वागते.

पुढे अजितही वाहत जातो, बदफैली बनतो पण सुचेताचे अजितविषयीचे प्रेम कमी होत नाही. तर ते वाढतच जाते. या विषयी लेखिकेला ती म्हणते, "येतील ग ते दिवस वसू - अजून अजितचं लग्न झालेलं नाही. कधी ना कधी तरी त्यांना उमजेल की, आपली खरी पत्नी सुचेताच आहे. तिच्याशिवाय आपल्याला शांती मिळायची नाही. त्यांना येऊ देत. मी आपण होऊन गळ घालणार नाही. पण त्यांना स्वत:हून येऊ देत. मग मी आपण होऊन त्यांच्या स्वाधीन होईन- खरंच अगदी लवकरच ते दिवस येणार आहेत. मी वाट पाहतेच ना त्यांची -कसं तुम्हाला समजत नाही ?"[४१] ('सुचेता' - जं. के. तीर - पृ. ४२) एकदा एकाला मनोमन वरलं की, दुसऱ्याचा विचार नाही. भलेही तो बदलो, बिघडो. त्याला आपलं मानायचं केव्हा येईल तेव्हा त्याला सर्वस्व द्यायला तयार व्हायचे अशा वेगळ्या जाणिवा असणारीही 'सुचेता' आहे.' पण या जन्मी नाही

आला तरी पुढच्या जन्मी तो आपल्याला भेटावा म्हणून या जन्मी जन्मभर पुण्यकृत्य करीत राहीन अशी तिची जिद्द होती ' हे लेखिकेचे वाक्य भाबडेपणाचे वाटते.

वसुधा पाटील यांच्या प्रेमकथातून जन्मोजन्मी प्रियकराची वाट पाहणाऱ्या मनस्वी तरुणी आहे. तर बदफैली बनून प्रेयसीला नकार देणारे तरुणही आहेत. प्रीतीच्या बळावर हयात काढणाऱ्या स्त्रिया आहेत. तर प्रेमविरहाने व्याकूळ झालेले व मिलनासाठी आतुर झालेले स्त्री-पुरुष आहेत. वसुधा पाटील आपल्या प्रेमकथातून अश्लिलतेचा वापर न करता हृदयस्पर्शी संभाषणाद्वारे प्रेमकथा रंगविताना दिसतात. वसुधाबाईंच्या प्रेमकथा प्रेमाचा वसा घेऊन स्त्री मनाचा आदर्श जोपासतात. मार्मिक व रसाळ संवादातून त्यांनी आपल्या प्रेमकथा फुलविल्या आहेत. त्यांच्या प्रेमकथा कितीही वाचल्या तरी त्या पुन:पुन्हा वाचाव्याशा वाटतात.

४) <u>बालमनाचे दर्शन घडविणाऱ्या कथा</u> :

वसुधा पाटील यांनी लहानमुलांचे चित्रण उत्कटतेने केले आहे. त्यांनी लिहिलेल्या लहानमुलांच्या गोष्टीमध्ये अनाथपण, पोरकेपण, बालपणीच्या आठवणी याचे दर्शन घडविले आहे.

श्रीनिवास सारखी कितीतरी मुले अनाथ असतात. आईवडिलांचे छत्र हरविलेले असते. त्यांना कुणाचाही आधार नसतो. अशावेळी सुखसमाधान मिळावं ही इच्छा असते. 'श्रीनिवास पानसेचे अंगण' या कथेतून त्याचा प्रत्यय येतो. या कथेतून लेखिकेचे जीवनविषयक श्रध्दाशिल व भावनाशील मन दिसून येते. या कथेतील श्रीनिवास अनाथ व पोरका आहे. " माझे अंगण" या लेखिकेने दिलेल्या पहिल्या निबंधातून श्रीनिवास कल्पनातीत पातळीवर अगदी साध्या सरळ शब्दात अंगणाचे सुबक वर्णन करतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

लेखिकेने निबंधासाठी दिलेला निबंधाचा दुसरा विषय होता "मला नाचावेसे वाटते." इतर विद्यार्थ्यांचे निबंध अकृष्ठ दर्जाचे होते. पण श्रीनिवासचा निबंध वाचतांना मात्र लेखिका त्याच्या घरात प्रवेश करते. पोरात पोर होऊन श्रीनिवासच्या बरोबर आईच्या खोडया काढणारे बुलबुलतरंग वाजविणारे त्याचे वडील रसिक आहेत. पावसात भिजल्यावर ते कधी श्रीनिवासवर रागवत नाहीत. कधी कधी आपल्या जाडयाभरडया आवाजात गातात ... बुलबुल तरंग वाजवितात. तेंव्हा मात्र श्रीनिवासला राहवत नाही. त्याला जे वाटले ते आपल्या निबंधात तो लिहितांना म्हणतो - "चांदण' पडलेलं असलं, अनंताची फुलं फुललेली असली, नि बाबा बुलबुलतरंग वाजवीत असले की मला वाटतं, अशा वेळी पायात चाळ बांधून खुशाल रात्रभर नाचत राहावं - मुलीसारखे घुंगुर बांधून नाचतोय म्हणून कुणी हसू नये मात्र ... " (श्रीनिवास पानसेचे अंगण - ज. के. तीर -पृ. ४) असं कल्पनातीत जग तो निबंधात रंगवितो पण वास्तवात मात्र श्रीनिवास घर, दार, अंगण आई-वडील यांच्यापासून तो पोरका आहे. वास्तवात मात्र हे असं असावं त्याला मनापासून वाटतं.

निबंधातील मुक्त कल्पनेतून अतृप्त इच्छांना श्रीनिवास वाट करून देतो. पण कल्पना सृष्टीपेक्षा वास्तव जीवन किती भयानक आहे हे त्याला या जगात अनाथ म्हणून वावरत असतांना आणि पोट भरण्यासाठी घरोघरी जाऊन पेपर आणि दुधाच्या बाटल्या देताना समजते. या भयावह जीवनामध्ये तो एकटाच लढतांना दिसतो. श्रीमती वसुधा पाटील आपल्या प्रगट मुलाखतीत म्हणतात - "माझी आई लहानपणीच गेली व त्यानंतर वडीलही गेले. त्यांनी ही कथा आपल्याला खूप आवडते असेही म्हटले होते". कदाचित नकळतपणे लेखिकेला लहानपणी जाणवलेली पोरकेपणाची जाणिव या कथेतून व्यक्त केली असावी असे वाटते.

श्रीनिवास एक दिवस अचानक लेखिकेला भेटला आणि त्याने ओळख करून दिल्यावर तो त्यांना ओळखता आला कारण निबंधाच्या कल्पना

विश्वातला रंगीत दृश्यातला, पावसात बेहोष होऊन नाचणारा हा श्रीनिवास नव्हता. समोरचा श्रीनिवास दुष्काळातून आल्यासारखा वाटत होता. कारण वास्तव जीवनाशी अनाथ म्हणून तो झगडा देत होता. तो अनाथ आश्रमात राहत होता. अंगण, आईवडील हे सारं निबंधातलं वर्णन होत असे समजल्यावर श्रीनिवास पानसेच्या निबंधातून तळमळीने उतरलेल्या अपेक्षा फोल ठरतात. ते रंगफिके पडले की जीव गलबलायला लागतो.

कथेच्या शेवटी आलेला आशय व रहस्यमयता वाचकाला धक्का देणारा ठरतो. अशाप्रकारे वसुधा पाटील 'श्रीनिवासच्या बालमनातील कल्पनातीत विचारांना आपल्या कथेतून मुक्त वाटकरून दिली आहे. 'आम्ही तिघं' या कथेतून लेखिकेच्या बालपणातील आठवणी राघव, बाळू आणि लेखिका या तीन बालमनांचे चित्रण त्यांनी सहजतेने घडविले आहे. 'गानेवाला पंछी' या कथेतील पोपट आणि मैनाचे बालपण, बालपणातील जीवन, पोपट आणि मैना यांच्यातील मोकळेपण लेखिकेने प्रत्ययकारी शब्दात मांडले आहे.

५) <u>इतर स्फुट कथा</u> :

कांही वेळी स्त्रीविषयी पुरुषाच्या मनात गैरसमज होतात आणि मग त्या पुरुषाला सर्वच स्त्रिया तशा दिसू लागतात आणि जन्मभर अविवाहीत राहाण्याचा निर्णय ही मंडळी घेऊन जातात. पण एखादया साध्या स्त्रीच्या दर्शनानेही त्यांचे मत परिवर्तन होते आणि मग तिचा मोह लागतो याची जाणीव 'बिंदा' या कथेतून होते.

अजयबाबूंच्या स्त्रीविषयक चमत्कारिक कल्पना आहेत. अजूनही ते अविवाहीत आहेत. वैराग्यासारखे राहतात. शिवानी काकी आणि रेणू या निकटच्या स्त्रियांवरूनच ह्यांनी स्त्री बद्दलची रूपरेषा आखली आहे. शिवानी काकी बद्दल त्यांना प्रेम वाटते, आदराची भावना आहे. पण एक स्त्री म्हणून त्यांनी काकीला कवडीभरही किंमत दिली नाही. कारण काकांना तिच्या कठोरपणामुळे कधी सुख समाधान मिळाले नव्हते. तशीच बिपीनची बायको रेणू

ही होती. स्त्रीमनाचा ओलावा तिच्यात नव्हता. सदा, नीरस दुर्मुखलेल्या चेहऱ्याने वावरत होती. शिवानी काकीबरोबर बिंदा अजयबाबूंच्या घरी येते आणि त्यांचं स्त्री विषयीचे कल्पनाविश्वच बदलून जातं.

अजयबाबूंनी घरी प्रवेश करताच बाथरूममधून कोमल व मार्दव सुरात गाणाऱ्या बिंदाचे स्वर कानी पडतात. आणि ते दरवाज्याच्या फटीतून बारीक नजरेनं पाहतात. आतील दृश्य पाहून अजयबाबूंच्या शरीरातून लखलख वीज चमकून जाते. कारण बिंदा आतमध्ये नग्नावस्थेत नाहत होती. मंदप्रकाश आत येऊन तिच्या नग्न सुस्नात शरीरावर विसावला होता. नकळतपणे बिंदाविषयी अजयबाबूंना आकर्षण वाटते. कारण स्त्री इतकी सुंदर, कोमल, मार्दवमुक्त असते याची त्यांना कल्पना नसते. इतका गोडवा इतकी मृदूता स्त्रीच्या आवाजात असते याचा अनुभव नव्हता. 'बिंदा या जवळ जवळ वेडयात गणना केलेल्या स्त्रीमध्यें हे सारे गुण होते. म्हणूनच अजयबाबू बिंदाला यात्रेला न नेण्याचा सल्ला काकीला देतात व बिंदाशी लग्न करण्याचा आपला धक्कादायक बेत काकीला देतात.

कधी कधी मृत्यूसारखी एखादी आपत्ती कुटुंबावर येते व संपूर्ण कौटुंबिक जीवनच विस्कळीत होते. जीवनाचा अर्थ लोप पावल्यासारखा वाटू लागतो व जीवन जगणे असह्य होते. 'खोटारडी' या कथेतून याचे दर्शन घडते.

लवंदे हा या कथेतील संसारी पुरूष असून त्याला तीन मुले आहेत. मणक्याच्या आजारात त्याची बायको दगावते. अडचणी मागून अडचणी येऊन त्याच्या संसाराची वाताहत होते. त्यामूळे तो स्वत:च सिक लिव्हर होतो, आणि संसाराला व जीवनाला कंटाळतो. सुरूवातीला उंचापूरा, देखणा, राजबिंडा दिसणारा लवंदे पाण्याचा पितर होऊन कळकट होतो. गंगाधरच्या बायकोशी लग्नापूर्वी त्याचे प्रेम होते. पण तिच्या वडिलांनी गंगाधरबरोबर तिचे लग्न केल्याने दोन मनांची ताटातूट होते. गंगाधरची बायको व लवंदेची योगायोगाने एक दिवस मंडईत भेट होते. लवंदेची पत्नी गेल्यावर ती त्याच्या

घरी येऊ लागते व घरचं सर्व पाहू लागते. गंगाधर हा मुलुखाचा ऐेदी माणूस असून त्याचे वागणे धरबंद नसल्यासारखे होते. तो कामापुरताच घरी असतो. एरवी बाहेर मोठया उचापती करत असतो. त्यामुळे त्याच्या बायकोचा घरी कोंडमारा होतो. मूल नसल्याने मातृत्वाची भावना अपुरी राहते. शेवटी खोटे सांगून ती लवंदेच्या विस्कळीत जीवनाला, हातभार लावण्याचा प्रयत्न करते. अशीही खोटारडी नकळतपणे लवंदेच्या सहवासात, त्याच्या मुलांचे सारं करण्यांत त्याच्याकडे जाण्यासाठी नवऱ्याच्या परवानगीची तिला आवश्यकता वाटत नाही.

आई होण्याची प्रत्येक स्त्रीची इच्छा असते. पण ती पूर्ण न झाल्याने तिच्या जीवनात जी उदासीनता येते किंवा एका बाजूला पतीचे म्हणावे तितके प्रेम न मिळाल्याने एका गुदमरलेल्या स्त्रीचे चित्रण वसुधा पाटील साकार करतात. दोन मनांची झालेली ताटातूट आणि कथेच्या शेवटी योगायोग म्हणून दोन मनांची भेट घडवून कथेची उत्कंठा वाढविण्यात वसुधा पाटील यशस्वी झाल्याचे आढळते.

लेखिकेची चित्रकलेविषयीची जाण, चित्रकलेविषयीचे ज्ञान आवड आणि निरीक्षण शक्ती याचे दर्शन 'न्यूड' या कथेतून घडते. स्वत: लेखिका ऐंटीर पेंटींग कोर्स पूर्ण केलेल्या असून लेखिकेच्या आर्टमास्टरच्या वेळचा व्यक्तिगत अनुभव व्यक्त केला आहे. 'न्यूड' या संपूर्ण वर्णनामध्ये कुठेही बिभत्सपण किंवा अश्लिलता येत नाही, जाणवते ते एक कलात्मक सौंदर्यच. संपूर्ण कथाभर पात्रांच्या नावाचा उल्लेख नसून अपवाद म्हणून मॉडेलच्या नावाचा 'बायजाबाई' असा कथेच्या शेवटी येतो, त्यामुळे कथेला प्रतिनिधीक स्वरुप प्राप्त होते.

परीक्षा हॉलमधील विद्यार्थ्यांच्या मन:स्थितीचा प्रसंग रेखाटला असून, विद्यार्थ्यांची मॉडेलशी, तिच्या रंगाशी, आकाराशी, एकरूप होऊन कॅनव्हासवर उतरविण्यासाठी चाललेली धडपड याचे जिवंत चित्रण लेखिकेने वाचकासमोर उभे केले आहे. मॉडेलच्या नग्नावस्थेचे वर्णन, छाया प्रकाशाचे बारीक सारीक तपशील

लाईफ पेंटींगविषयीचे वर्णन इतक्या प्रभाविपणे झाले आहे की, कथा वाचत असतांना आपणही परीक्षा हॉलमध्ये उपस्थित असल्याचा भास होतो. इंग्रजी शब्दांचा अचूक वापर केलेला असून पेंटींगच्या विद्यार्थी जगातले शब्द वापरले गेल्याने वातावरण निर्मिती प्रसंगाला अनुरूप झाली आहे. उदा. ड्रेपरी, मॉडेल, टुडे लाईफ इज विदाऊट ड्रेपरी, स्केचेस, आऊट लाईन, यलो ऑकर ब्राऊन, क्रिम्झन लेक , डार्कशेड इत्यादी शब्दांची निर्मिती अचूकपणे केली आहे.

कथेच्या शेवटी सर्व परीक्षा हॉल रिकामा झाल्यानंतर तन्मयतेने चित्र रंगवणारा 'तो' येतो. इतर परीक्षार्थी पेक्षा तो वेगळा असून इतरांपेक्षा एक वेगळे चित्र त्याने रेखाटले आहे. बसमध्ये पूर्वी त्याने पाहिलेली व त्याच्या मनात घर करून बसलेली जी त्याला मनापासून आवडली होती. ती तरुणी तो मॉडेलच्या ठिकाणी पाहतो आणि रेखाटतो. कारण ती सुंदर असते. 'बायजाबाई' म्हणावी तेवढी सुंदर नसते. या कथेचे शीर्षक 'न्यूड' असे असून परीक्षेपुरतेच न्यूड मॉडेल एवढया पुरताच हा अर्थ सीमित वाटत नाही. 'तो' च साडीत पाहिलेल्या तरुणीचं न्यूडच्या रूपात पाहणं आणि रंगवणं हे 'न्यूड'ला वेगळा अर्थ प्राप्त करून देते. न्यूड मॉडेल आणि साडीतील तरुणी यांचं मनाच्या पातळीवर मिश्रण होऊन तरुणीचं न्यूड पेंटींग आकार घेतं.

संदर्भ



| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | पवार गो.मा. (संपा.) हातकणंगलेकर म.द. | मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप प्र.आ. १९०७ | १७५ |
| २) | पाटील वसुधा पदमाकर | जमुना के तीर प्र.आ. १९९८ | ४८ |
| ३) | तत्रैव | तत्रैव | ५१ |
| ४) | तत्रैव | तत्रैव | ५५ |
| ५) | तत्रैव | तत्रैव | १८६ |
| ६) | तत्रैव | तत्रैव | १९२ |
| ७) | तत्रैव | तत्रैव | २१८ |
| ८) | तत्रैव | तत्रैव | २१९ |
| ९) | तत्रैव | तत्रैव | २२२ |
| १०) | तत्रैव | तत्रैव | २२७ |
| ११) | तत्रैव | तत्रैव | ८२ |
| १२) | तत्रैव | तत्रैव | ८४ |
| १३) | तत्रैव | तत्रैव | ८५ |
| १४) | तत्रैव | तत्रैव | ८६ |
| १५) | तत्रैव | तत्रैव | ९२ |
| १६) | तत्रैव | तत्रैव | १०४ |
| १७) | तत्रैव | तत्रैव | १८१ |
| १८) | क-हाडे सदा | ललित-मे-१९७८ | १८ |
| १९) | पाटील वसुधा पदमाकर | वेगळी | ८ |
| २०) | तत्रैव | तत्रैव | १२ |

संदर्भ

| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २१) | पाटील वसुधा पद्माकर | वेगळी | १९ |
| २२) | तत्रैव | तत्रैव | १९ |
| २३) | तत्रैव | तत्रैव | १२९ |
| २४) | तत्रैव | तत्रैव | १३१ |
| २५) | तत्रैव | तत्रैव | १३८ |
| २६) | तत्रैव | तत्रैव | १५० |
| २७) | तत्रैव | तत्रैव | १११ |
| २८) | तत्रैव | तत्रैव | ११४ |
| २९) | तत्रैव | तत्रैव | २४ |
| ३०) | तत्रैव | जमुना के तीर | १६३ |
| ३१) | तत्रैव | तत्रैव | १६६ |
| ३२) | तत्रैव | तत्रैव | २९ |
| ३३) | तत्रैव | तत्रैव | १४५ |
| ३४) | तत्रैव | तत्रैव | १३८ |
| ३५) | तत्रैव | वेगळी | ९० |
| ३६) | तत्रैव | तत्रैव | ५३ |
| ३७) | तत्रैव | तत्रैव | ५८ |
| ३८) | तत्रैव | ज. के. तीर | ३२ |
| ३९) | तत्रैव | तत्रैव | ११६ |
| ४०) | तत्रैव | तत्रैव | ३९ |
| ४१) | तत्रैव | तत्रैव | ४२ |
| ४२) | तत्रैव | तत्रैव | ४ |

...